



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक २१८ * नांदेड * सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

## ‘वंदे मातरम’च्या अपमानावरून सोनिया गांधींविरोधात तक्रार दाखल



**कर्नाटक (वृत्तसंस्था) –** ‘वंदे मातरम’च्या अपमानावरून काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. कर्नाटकातील मंगळूर येथील उर्वा पोलीस ठाण्यात भाजप नेत्यांकडून सोनिया गांधी यांच्या विरोधात औपचारिक तक्रार दाखल करण्यात आली आहे. स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात ‘वंदे मातरम’ गायले जात असताना ते दोन कडव्यांनंतर थांबवण्याचे निर्देश दिल्याचा आरोप भाजपकडून करण्यात आला आहे.

भाजप नेते विकास पुत्तूर यांनी या प्रकरणी पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या आरोपानुसार १५ ऑगस्ट रोजी काँग्रेसच्या राष्ट्रीय मुख्यालयात ध्वजारोहण कार्यक्रमादरम्यान ‘वंदे मातरम’ सुरू असताना सोनिया गांधी यांनी कार्यक्रमात हस्तक्षेप केला आणि ते थांबवण्यास सांगितले. पुत्तूर यांनी या कृतीवर आक्षेप घेत, याप्रकरणी एफआयआर दाखल करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. राष्ट्रीय गीताचा किंवा राष्ट्रीय सन्मानाचा अवमान झाल्यास संबंधित व्यक्तीचे पद किंवा राजकीय स्थान न पाहता कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे, असा दावा त्यांनी केला. तक्रारीवर पोलिसांनी योग्य ती कारवाई केली नाही, तर कर्नाटक उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचा इशारा विकास पुत्तूर यांनी दिला आहे.

या प्रकरणात कोणताही राजकीय हस्तक्षेप होऊ नये आणि तक्रारीची निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणीही त्यांनी केली.

## ‘२९ ऑगस्टला जीव गेला तरी चालेल, पण आंदोलनावर ठाम’

### अभ्यासकांसोबतच्या अंतरवाली सराटीतील बैठकीत मनोज जरांगेंचा निर्धार

**जालना (प्रतिनिधी) –** जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटीमध्ये मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलनाची हाक दिली आहे. २९ ऑगस्टला होणाऱ्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अंतरवाली सराटीमध्ये अभ्यासकांसोबतच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये सरकारसमोर मांडलेल्या आधीच्या मागण्या आणि त्या संबंधित कायदेशीर माहितीविषयी चर्चा झाली. या सोबतच सरकारने दिलेल्या एसओपी संदर्भात देखील चर्चा झाल्याची माहिती आहे. यावेळी बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टला होणाऱ्या आंदोलनात जीव गेला तरी चालेल, पण आंदोलनावर ठाम असल्याचा निर्धार केला आहे.

अभ्यासकांसोबतच्या बैठकीत मनोज जरांगेंनी चर्चा करून पुढील आंदोलनाची दिशा ठरवली आहे. दरम्यान, सरकारने काढलेल्या जीआरमध्ये चुका असल्याचं मान्य करावं, आणि त्यात सुधारणा करावी, अशी मागणीही यावेळी त्यांनी केली आहे.



यावेळी बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मी चर्चेत तीन प्रश्न घेतलेत. आतापर्यंत जे सरकारने जीआर काढले त्यात काही बदल करायचे आहेत का? शिवाय या पुढे जे जीआर काढणार आहेत ते कसे काढायचे आणि ओबीसी सवलतीवर चर्चा करण्यात आली. सरकारने हैदराबाद गॅझिटीयर आणि ओबीसी सवलतींचे जीआर काढले, त्यात काय बदल, सुधारणा करायच्या हा प्रश्न मी अभ्यासकांना विचारला. दरम्यान, अभ्यासकांना समाजाने नाव ठेवू नये, मी वेळ दिला म्हणून आलोय. सरकारने आता पुढचं ठरवायचंय. मात्र समाजाला जे हवं आहे ते आम्ही मिळवून राहू, असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले. दरम्यान, सरकारने काढलेल्या जीआरमध्ये चुका असल्याचं मान्य करावं, आणि त्यात सुधारणा करावी, अशी मागणीही यावेळी त्यांनी केली आहे.

रक्तातला, नात्यातला की कुळाचा या बाबत गृहचौकशी व्हावी, अशी मागणी करत याबाबत अभ्यासकांनी प्रशासकीय पातळीवर येत असलेल्या अडचणींबाबत म्हणणं मांडलं. यावेळी अभ्यासकांनी सांगितलं की गावस्तरीय समितीला संविधानिक अधिकार द्यावेत. त्यांनी केलेली शिफारस मान्य करण्यात यावी. मराठवाड्यात ज्यांच्या नोंदी सापडल्या नाहीत त्यांच्या नोंदी शोधण्यात याव्यात. शिंदे समितीने काम केलेलं नाही. मराठवाड्यातील सर्व मराठा कुणबी आहेत हे सरकारने मान्य करावं.

ज्यांच्या नोंदी नाहीत त्यांना कुणबी प्रमाणपत्र देणे, सध्याच्या जीआरमुळे शक्य नाही. व्हॅलीडीटी कायद्यात सुधारणा करावी. २००१ आणि २०१२ च्या कायद्यात सुधारणा हवी. हैदराबाद गॅजीटियरमधील संख्येनुसार सर्वांना कुणबी प्रमाणपत्र मिळावे, यावर सर्वांचे एकमत झाल्याचे चर्चेत बघायला मिळाले.

## उस्माननगर ठाण्याच्या हद्दीत पिस्तूल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी) –** पिस्तूल बाळगणाऱ्यांबाबत माहिती घेत असताना एक युवक मारतळा ते गोळेगाव जाणाऱ्या रोडवर चंद्रमा बारसमोर पिस्तूल ताब्यात बाळगून थांबलेला असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यावरून त्यास पिस्तूलसह ताब्यात घेतले.

या प्रकरणी पंचासह घटनास्थळी पाहणी केली असता एक युवक पोलिसांना पाहून पळून जाण्याचा प्रयत्न करताना आढळून आला. पोलिसांनी त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. त्याचे नाव व गाव विचारले असता त्याने आपले नाव अभिजीत कैलास पवार, वय २० वर्षे, रा. दत्तमंदिर समोर, असदवन, ता. जि. नांदेड असे सांगितले. अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेला एक गावठी पिस्तूल (अंदाजे किंमत ३० हजार रुपये) मिळून आले. सदर शस्त्राबाबत वैध परवाना विचारला असता तो कोणताही परवाना सादर करू शकला नाही. सदर गावठी पिस्तूल जप्त करून आरोपीस पुढील कायदेशीर कारवाईसाठी उस्माननगर पोलिसांच्या ताब्यात देऊन त्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या दोन्ही पथकाचे पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी कौतुक केले.

## उच्च न्यायालयाच्या लिपीक टंकलेखन कौशल्य ऑनलाईन परीक्षेत गोंधळ

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) –** मुंबई उच्च न्यायालयाच्या लिपीक पदाच्या टंकलेखन कौशल्य ऑनलाईन परीक्षेत मोठा गोंधळ झाल्याचं छत्रपती संभाजीनगर येथे पाहायला मिळालं. याशिवाय कल्याण, वाशिम आणि भंडारा येथे देखील परीक्षेत तांत्रिक अडचणी दिसून आल्या. या परीक्षेतील गोंधळामुळं विद्यार्थ्यांनी कोर्टाच्या आवारात आंदोलन सुरु केलं. या विद्यार्थ्यांना समर्थन देण्यासाठी सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके दाखल झाले. याशिवाय कल्याण-मधील विद्यार्थ्यांसोबत अभिजीत दिपके यांनी व्हीडीओ कॉलवर संवाद साधला.

मुंबई उच्च न्यायालयाच्या लिपीक पदाच्या टंकलेखन कौशल्य ऑनलाइन परीक्षेत राज्यभर गोंधळ झाला आहे. छत्रपती संभाजीनगरचं नाही तर नांदेड, कल्याण, ठाणे, नाशिक, गोंदियामध्ये ऑनलाइन परीक्षेत गोंधळ होत आहे, की बोर्ड काम करत नाही, सर्व्हर काम करत नाही. १० मिनिटात लॉग आऊट होऊन जात आहे. म्हणजेच एका शिफ्टमध्ये असलेले विद्यार्थी फेल झाले. एवढा सगळा गोंधळ असताना ही परीक्षा कशी होऊ शकते, त्याम ुळं ही परीक्षा पुन्हा घेतली गेली पाहिजे, असं अभिजीत दिपके यांनी म्हटलं. हा मुद्दा फक्त संभाजीनगरचा राहिलेला नाही, राज्याचा मुद्दा झाला आहे. जोपर्यंत फेरपरीक्षा घेण्याबाबत नोटिफिकेशन काढलं जात नाही आणि विद्यार्थ्यांना हार्डकॉपी मिळाली पाहिजे. परीक्षा देणारे विद्यार्थी बसून राहणार असतील तर मी देखील बसून राहणार असल्याचं अभिजीत दिपके यांनी म्हटले आहे.

## शिंदे गटाच्या माजी नगरसेवकाकडून विमानतळावर गोळीबार; दोघे जखमी

**वाराणसी (वृत्तसंस्था) –** शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवक कमलेश राय यांनी त्यांच्या बंदुकीतून दोन राउंड गोळीबार झाल्याची घटना घडली आहे. या गोळीबारात दोनजण गंभीर जखमी झाले आहेत. वाराणसी विमानतळावर ही घटना घडली. कमलेश राय आणि त्यांची पत्नी वाराणसी विमानतळामधून मुंबईसाठी निघाले होते. यावेळी वाराणसी विम ानतळावर परवानाधारक बंदुकीतून त्यांनी गोळीबार केला. पिस्तूल तपासणीदरम्यान माजी नगरसेवक कम लेश राय यांच्याकडून गोळी सुटल्याची माहिती मिळत आहे.

वाराणसी एअरपोर्टमध्ये बंदूक लॉक करत असताना माजी नगरसेवक कमलेश राय यांच्या बंदुकीतून दोन राउंड फायरिंग झाले आहेत. वाराणसी एअरपोर्ट परिसरात गोळीबार झाल्यामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. एअरपोर्ट सुरक्षा रक्षकाने कमलेश रायला ताब्यात घेऊन चौकशी करत आहेत.

## नवीन मोंढा परिसरात अवैध गावठी पिस्तूलसह दोन जण ताब्यात; ‘स्थागुशा’ची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी) –** जिल्ह्यात अवैध अग्निशस्त्रांची खरेदी- विक्री करणाऱ्यांविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत अवैध गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या दोन इसमांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून १ गावठी पिस्तूल जप्त करण्यात आले आहे.

दि. १४ ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि साईनाथ पुयड व त्यांचे पथक अवैध अग्निशस्त्र बाळगणाऱ्या इसमांचा शोध घेण्यासाठी नांदेड शहरात गस्त घालत होते. यावेळी शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतील कृषी उत्पन्न बाजार समिती, नवीन मोंढा परिसरात दोन युवक संशयास्पदरीत्या फिरत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. माहितीच्या आधारे पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत दोन्ही संशयितांना ताब्यात घेतले. अंगझडतीत पिस्तूल आणि मॅगझिन सापडले.

पोलिसांच्या चौकशीत आदित्य उर्फ मालको सुनील शर्मा वय १९ वर्षे, रा. नवीन मोंढा, मगनपुरा,



नांदेड व विवेक उर्फ विकास उर्फ विक्की नरहरी सूर्यवंशी वय २४ वर्षे, रा. आंबेडकर नगर, त्रिरत्न बौद्ध विहाराजवळ, नांदेड अशी नावे निष्पन्न झाली. पथकाने दोघांची अंगझडती घेतली असता आदित्य शर्मा याच्या ताब्यातून काळ्या रंगाचे एक गावठी पिस्तूल व मॅगझिन मिळून आले. सदर अग्निशस्त्राची अंदाजे किंमत ३५ हजार रुपये असल्याचे सांगितले आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दोन्ही आरोपींविरुद्ध गु.र.नं. ३५६/२०२६ कलम ३/२५ भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.




**नांदेड –** काँग्रेस पक्षाच्या नेत्या खासदार सोनिया गांधी यांनी राष्ट्रीय गीत वंदे मातरम्‌चा अपमान केल्याबद्दल आयटीआय चौक महात्मा फुले पुतळ्यासमोर भारतीय जनता पार्टी नांदेड महानगर युवा मोर्चाच्या वतीने कॅन्डल मार्च करून तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष चैतन्यबापू देशमुख, माजी उपनगराध्यक्ष प्रवीण साले, युवा मोर्चा महानगराध्यक्ष शशिकांत क्षीरसागर, नगरसेवक आशुतोष जोशी, सुषमा थोरात, महादेवी मठपती, पुनिता रावत, अनिलसिंह हजारी, हरीश ठक्कर, शिवा लोट, पार्थ देशमुख, नागनाथ गड्डम, ओम बंडेवार, शशीतारका पांढरे यांच्यासह आदींची उपस्थित होती. **(छाया : करणसिंह बैस, नरेंद्र गडप्पा, ज्ञानेश्वर सुनेगावकर)**

### नांदेड पोलीस परिक्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

## शहाजी उमाप यांना ‘अतिउत्कृष्ट सेवा पदक’ जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी) –** भारत सरकारच्या गृह मंत्रालयाकडून स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांच्या दीर्घकालीन, उल्लेखनीय व निष्कलंक सेवेची सन्मानपूर्वक दखल घेण्यात आली आहे.

पोलीस दलातील अधिकाऱ्यांपासून ते अंम लदारांना ‘अतिउत्कृष्ट सेवा पदक’ तसेच ‘उत्कृष्ट सेवा पदक’ जाहीर करण्यात आले आहेत. यात नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना त्यांच्या दीर्घकाळच्या प्रामाणिक, कर्तव्यनिष्ठ आणि समर्पित सेवेबद्दल केंद्रीय गृह मंत्रालयाकडून ‘अतिउत्कृष्ट सेवा पदक’ जाहीर झाले आहे. हा सन्मान नांदेड जिल्हा पोलीस दल आणि परिक्षेत्रासाठी अभिम ानाची बाब ठरला आहे.

डीआयजी उमाप यांना यापूर्वीच राष्ट्रपती पदक, पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह यासह अनेक




राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स कार्यक्रमात त्यांनी आपल्या परिक्षेत्रात अधीनस्थ अधिकाऱ्यांमार्फत उत्कृष्ट सुधारणा कार्यक्रम राबविला. याचा परिणाम म्हणून नांदेड पोलीस महानिरीक्षक कार्यालयाने राज्यात प्रथम क्रमांक मिळविला. २०० पैकी १२१.२३ गुण मिळवून हे कार्यालय राज्यात अव्वल ठरले. त्यानंतरच्या १०० दिवसांच्या कार्यक्रम ातही नांदेड दुसऱ्या स्थानावर राहिले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच त्यांचा मुंबई येथे सन्मान केला होता. यापूर्वी पोलीस अधीक्षक तसेच अतिरिक्त पोलीस अधीक्षक म्हणून नांदेड जिल्ह्यात कार्यरत असताना त्यांनी तंटामुक्ती अभियानात नांदेड जिल्ह्याला राज्यातून पहिला क्रमांक मिळवून दिला होता. त्यावेळी तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी त्यांचे तोंडभरून कौतुक करत पदक देऊन गौरव केला होता.

नांदेड परिक्षेत्राचा पदभार घेतल्यानंतर त्यांनी कार्यालयात ई- टपाल सेवा सुरू केली. तसेच चारही जिल्ह्यातील गुन्हे संदर्भातील माहिती वरिष्ठ कार्यालयास तत्काळ मिळावी यासाठी परिक्षेत्राची पहिली अधिकृत वेबसाइट सुरू केली. नागरिकांचा पोलीस दलावरील विश्वास वाढावा यासाठी ‘जनसंवाद’ उपक्रम सुरू केला. या उपक्रमाला नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला असून तो उपक्रम आजही सुरू आहे. त्यांनी अवैध व्यवसाय निर्मूलन मोहीम राबवून आतापर्यंत कोट्यवधी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अनेक गुन्हेगारांविरुद्ध मोका, तडीपार आणि MPD सारखे प्रस्ताव मंजूर करून त्यांना तुरुंगात पाठविले आहे. नुकतेच त्यांना अतिउत्कृष्ट सेवा केल्याबद्दल पोलीस महासंचालक पदकाने देखील सन्मानित करण्यात आले होते.

**स्वातंत्र्यदिनी सन्मान**

स्वातंत्र्यदिनी पालकमंत्री सावे यांच्या हस्ते त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

नांदेड जिल्ह्याचे नाव पुन्हा एकदा पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी सुवर्ण अक्षरात पोलीस दलात नोंदवले आहे. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण नांदेड पोलीस दलाची मान उंचावली आहे.




## धनेगाव पेट्रोल पंपावरील खंजर हल्ला प्रकरण; एका महिलेला न्यायालयीन, ४ आरोपींना १८ पर्यंत पोलीस कोठडी

**नांदेड (प्रतिनिधी) –** जुन्या वादाचा सूड घेण्याच्या उद्देशाने धनेगाव येथील पेट्रोल पंपावर इंदरजितसिंग बावरी याच्यावर खंजरने हल्ला केल्याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपींना रविवारी प्रथमवर्ग न्यायाधीश के. बी. सोनवणे यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने ज्योती जगदीश बिगानिया हिला न्यायालयीन कोठडी सुनावली, तर इतर ४ आरोपींना पुढील तपासासाठी ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

ही धक्कादायक घटना एका पेट्रोल पंपावर दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी घडली होती. संत गाडगेबाबा सोसायटी, जुना कौठा येथील रहिवासी इंदरजितसिंग बावरी हे त्याच्या चुलत भावासोबत फायनान्सच्या कामानिमित्त धनेगाव येथील पेट्रोल पंपावर गेले होते. त्यावेळी मोटारसायकलवरून आलेल्या आरोपींनी जुन्या वादाचा राग मनात धरून त्यांच्यावर खंजरने हल्ला केला होता. या हल्ल्यात त्याच्या पोटावर आणि छातीवर गंभीर जखमा झाल्या होत्या. या हल्ल्यात इंद्रजीतसिंग याचा जागीच मृत्यू झाला तर त्याचा सहकारी जखमी झाला होता.

या प्रकरणी पोलिसांनी दिलीप पुंडलिक डाकोरे (वय ३३), कृष्णा दिगंबर बारोळे (वय २९), रणजित उर्फ रंज्या चांदू सूर्यवंशी (वय २३), ज्योती जगदीश बिगानिया (वय ४०), अजय उर्फ अज्जू महेंद्र बिगानिया (वय २७) तसेच एका विधिसंघर्षग्रस्त बालकाला अटक केली होती. यापैकी पाच आरोपींना यापूर्वी १६ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली होती. रविवार दि. १६ ऑगस्ट रोजी पोलीस कोठडी संपल्यानंतर पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी आरोपींना न्यायालयात हजर केले.

### आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या पाठपुराव्याला यश

## माळेगाव यात्रा परिसर विकासासाठी ६ कोटी



**लोहा (प्रतिनिधी) –** माळेगाव यात्रा परिसर विकासासाठी आ. प्रतापराव पाटील यांनी प्रयत्न केले होते. त्यांच्या प्रयत्नाला यश आले असून, माळेगाव विकासाच्या कामासाठी ६ कोटींचा निधी मंजूर झाला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आ. चिखलीकर यांनी पाठपुरावा करून विविध कामांसाठी सहा कोटींचा निधी आणला आहे. त्या कामांचे नियोजन करण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसीलदार, बांधकाम पाणीपुरवठा व संबंधित विभागाची बैठक घेण्यात आली. कोणत्या कामाची आवश्यकता आहे यावर चर्चा झाली. प्राधान्याने आवश्यक असलेल्या विकासकामांचे अंदाजपत्रके तयार करावीत, असे आ. प्रतापराव पाटील विखलीकर यांनी सांगितले.

स्वातंत्र्यदिनी माळेगाव यात्रा शासकीय विश्रामगृह येथे यात्रा परिसर विकास आराखडा विषयी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, तहसीलदार विठ्ठल परळीकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दतात्रय गिरी, बीडीओ कुलकर्णी, युवा नेते सचिन पाटील चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पवार, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार जि. प. बांधकाम कार्यकारी अभियंता बालाजी पवार, लोहा तालुका उपाभियंता शिवाजी राठोड, सां. बा. विभागाचे उपकार्यकारी अभियंता सुमित पाटील, पाणी पुरवठा अधिकारी डी. बी. बनसोडे, माजी उपनगराध्यक्ष दता वाले, मंदिर ट्रस्टचे दयानंद पाटील, गटशिक्षणाधिकारी गंगाजी, माळाकोळी सहायक पोलीस निरीक्षक हिंगोले, इंजि. गुंडावार, माजी उपसभापती रोहित पाटील आंडगेकर, सतीश व्यवहारे, सरपंच हणमंत धुळगंडे, विजय वाघमारे यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# यूपीआय व्यवहार मोफतच हवे!

डिजिटल व्यवहारांच्या जगात भारताने गेल्या दशकात घेतलेली झेप जगासाठी कौतुकाचा विषय ठरली आहे. विशेषतः युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस अर्थात यूपीआयने आर्थिक व्यवहारांची व्याख्याच बदलून टाकली. हातात रोख रक्कम नसली तरी व्यवहार थांबत नाही, सुट्ट्या पैशांचा प्रश्न राहत नाही आणि बँकेच्या रांगेत तासन्तास उभे राहण्याची गरज उरत नाही. त्यामुळे यूपीआयवरील कोणत्याही संभाव्य शुल्काच्या चर्चेने सर्वसामान्यांच्या मनात निर्माण झालेली चिंता स्वाभाविक होती. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कमी मूल्याच्या बहुतांश यूपीआय व्यवहारांवर कोणतेही शुल्क आकारले जाणार नसल्याचे स्पष्ट केल्याने ही चिंता तूर्तास दूर झाली आहे. कायदे दुरुस्ती विधेयकामुळे यूपीआय व्यवहारांवर थेट कर किंवा शुल्क लादले जाणार नाही, हे सरकारने स्पष्ट केले आहे. भविष्यात व्यापारी सवलत दर अर्थात एमडीआर लागू करण्याचा निर्णय झाला तरी तो ठरावीक मर्यादेपेक्षा अधिक मूल्याच्या व्यावसायिक व्यवहारांपुरताच मर्यादित असेल, अशी भूमिका आहे. छोट्या दुकानदारांपासून भाजी विक्रेत्यांपर्यंत आणि रोजच्या गरजेच्या वस्तू खरेदी करणाऱ्या ग्राहकांपर्यंत कोणावरही त्याचा बोजा पडू नये, ही भूमिका स्वागतार्ह आहे. यूपीआयच्या यशाचे खरे गमकच त्याच्या सुलभता, वेग आणि शून्य व्यवहारखर्चात आहे. एखाद्या कुटुंबातील सदस्याला काही रुपये पाठवायचे असोत किंवा रस्त्याच्या कडेला चहा विकणाऱ्या विक्रेत्याला पैसे द्यायचे असोत, व्यवहार काही सेकंदांत पूर्ण होतो. 'रोख नाही' म्हणून व्यवहार नाकारण्याची वेळ अनेक छोट्या व्यावसायिकांवर येत नाही. डिजिटल व्यवहारामुळे ग्राहक आणि विक्रेता दोघांचाही वेळ वाचतो. यूपीआयने केवळ शहरांतील तंत्रज्ञानस्नेही वर्गाचे जीवन बदललेले नाही, तर त्याने आर्थिक व्यवहारांची लोकशाहीच घडवून आणली आहे. छोट्या व्यावसायिकांच्या खात्यातील व्यवहारांची डिजिटल नोंद त्यांच्या आर्थिक व्यवहारक्षमतेचा पुरावा ठरू शकते. भविष्यात बँक कर्ज मिळवताना ही पारदर्शकता उपयोगी पडू शकते. सावकारांच्या दारात जाण्याऐवजी औपचारिक आर्थिक व्यवस्थेत प्रवेश मिळवण्याचा मार्ग त्यामुळे अधिक सुलभ होतो. यूपीआयसारख्या सुविधांमुळे इंटरनेट किंवा महागडा स्मार्टफोन नसलेल्या ग्रामीण भागातील नागरिकांनाही डिजिटल व्यवहाराच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न झाला आहे. शहरांमध्ये काम करणारे स्थलांतरित कामगार आपल्या कुटुंबियांना गावाकडे तत्काळ पैसे पाठवू शकतात. म्हणजेच यूपीआय हा केवळ पेमेंटचा पर्याय राहिलेला नसून देशाच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनाचा महत्त्वाचा भाग बनला आहे. मात्र, सरकारने सध्याची मोफत सुविधा कायम ठेवण्याची हमी देताना काही मूलभूत प्रश्नांवरही स्पष्टता ठेवणे आवश्यक आहे. डिजिटल व्यवहारांची व्यवस्था उभी करण्यासाठी बँका, पेमेंट सेवा पुरवठादार आणि तंत्रज्ञान कंपन्यांना मोठा खर्च करावा लागतो. या व्यवस्थेची आर्थिक शाश्वतता कशी राखली जाणार, याचे उत्तरही भविष्यात द्यावे लागेल. मोठ्या व्यापाऱ्यांकडून शुल्क आकारण्याचा पर्याय असेल तर त्याची मर्यादा, रचना आणि परिणाम याबाबत पारदर्शकता आवश्यक आहे. कारण यूपीआयची ताकदच त्याच्या सर्वसमावेशकतेत आहे. आजचा छोटा भाजीवाला उद्याचा मोठा व्यापारी होऊ शकतो. आजचा रोजंदारी कामगार उद्याचा कर्जदार होऊ शकतो. डिजिटल अर्थव्यवस्था उभारताना या प्रवासातील पहिल्या पायरीवरच शुल्काचा अडथळा उभा राहिला, तर डिजिटल भारताचे स्वप्न अपूर्ण राहील. यूपीआयच्या दशकपूर्तीच्या टप्प्यावर सर्व-सामान्य नागरिकांना मिळालेली मोफत व्यवहाराची खात्री त्यामुळे महत्त्वाची आहे. डिजिटल क्रांतीचा खरा अर्थ केवळ व्यवहारांची संख्या वाढवणे नव्हे; तर आर्थिक व्यवहार सामान्य माणसासाठी स्वस्त, सुरक्षित, सुलभ आणि विश्वासार्ह करणे हा आहे. यूपीआयने हे सिद्ध केले आहे. आता पुढचे आव्हान त्याची ही लोकाभिमुख ओळख कायम ठेवण्याचे आहे. डिजिटल भारताची खरी कसोटी व्यवहार किती वेगाने होतात याची नसून, तो वेग आणि सुविधा सर्वसामान्यांच्या खिशाला परवडते का, याची आहे. यूपीआय मोफत राहणे ही केवळ ग्राहकांसाठी दिलासा देणारी बाब नाही; ती भारताच्या डिजिटल लोकशाहीची मूलभूत गरज आहे.

# निसर्गाच्या संरक्षणासाठी नागपंचमी दिनी व्हावे वृक्षारोपण!

श्रावण महिना आला की आगळे-वेगळे वातावरण निर्माण होते व सणांना सुरूवात होवून सर्वत्र उत्साहाचे वातावरण दिसून येते. श्रावण महिन्यात नागपंचमीला अत्यंत महत्व दिले जाते. नागपंचमीच्या दिवशी घरोघरी नागाच्या प्रतिमेची पूजाअर्चना केली जाते.नागपंचमीचा उल्लेख आपल्याला अनेक पुराणांमध्ये सुध्दा पहायला मिळतो.नागपंचमीचे महत्व भगवान श्रीकृष्णांशी सुध्दा निगडित आहे. याबाबतची कालियामर्दनाची आख्यायिका प्रसिद्ध आहे. या आख्यायिकेनुसार बालपणातील श्रीकृष्णाला मारण्यासाठी कंस कालिया नावाच्या नागाला पाठवितो. परंतु श्रीकृष्ण कालियाचा पराभव करतो व यमुना नदीच्या पात्रातून श्रीकृष्ण सुरक्षित वर येतात तो दिवस म्हणजे श्रावण शुद्ध पंचमी. पराभवानंतर कालिया नाग श्रीकृष्णाची माफी मागतो आणि तेथुन निघुन जातो. त्यामुळे कालिया नागावरील कृष्णाच्या विजयाला सुध्दा नागपंचमीच्या स्वरूपात साजरी केली जाते.

दर १२ वर्षांनी नागपंचमीच्या दिवशी देशभरातील नाथ संप्रदायाचे लोक गंगा-गौतमी (अहिल्या - गौतमी) संगमावर स्नान करतात. अशीही आख्यायिका आहे की, एक शेतकरी शेत नांगरणी करीत असताना नागिणीच्या तीन पिल्लांचा मृत्यू झाला व त्यामुळे नागदेवतेचा कोप झाला अशी समजूत प्रचलित आहे. त्यामुळे या दिवशी शेतकरी आपल्या शेतात नांगर, वखर, कोणतेही खोदकाम करीत नाही किंवा कोणत्याही औजारांचा वापर होत नाही.त्याचप्रमाणे घरकामात वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही औजारांचा वापर केला जात नाही. भाज्या चिरायच्या नाही, तव्याचा वापर नाही, कांडन नाही, कापन नाही, असे काही नियम आजही पाळले जातात. नागपंचमीच्या दिवशी श्रद्धाळू नागदेवतेच्या फोटोंची किंवा मूर्तींची पूजाअर्चना करून दूध-लाह्यांचा व शिऱ्याचा प्रसाद करून नैवेद्य दाखवतात आणि शेतीचे व आपले संरक्षण



करण्यासाठी सर्वच प्रार्थना करतात.

देशात श्रावण महिन्यात प्रत्येक सोमवारला अनेक मंदिरांमध्ये शेज (सजावट) केली जाते. त्याचप्रमाणे प्रत्येक देवतांच्या ठराविक दिवशी नीटनेटकी सजावट करून संपूर्ण श्रावण महिना मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने पाळला जातो. श्रावण महिन्यातील सोमवार हा उपवास बहुतेक सर्वच जण करतात व मोठ्या भक्तिभावाने शंकराची, शंकराच्या पिंडेची व नागाची पूजाअर्चना करतात. नागपंचमी हा श्रावण महिन्यातील पहिला सण असल्याने सर्वत्र आनंदमय व सुखमय वाता-वरण दिसून येते. श्रावण मासात विविध सण येतात. त्यापैकी नागपंचमी, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी, नारळी पौर्णिमा इत्यादी अनेक सण येतात. महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्याच्या पश्चिमेला असलेला शिराळा तालुका नागपंचमीसाठी जगप्रसिद्ध आहे.सांगली जिल्ह्यातील हा एकमेव प्रदेश निसर्ग समृद्ध आहे.

पूर्वी नागपंचमी उत्सव शिराळ्यात मोठ्या प्रमाणात साजरा केला जायचा.तेव्हा नागपंचमीच्या एक महिना आधी येथील नाग मंडळेनाग पकडायच्या मोहिमेला निघत. यानंतर पकडलेल्या नागांची (सापांची) नागपंचमी संपेपर्यंत योग्य प्रकारे काळजी घेतली जात असे. नागपंचमीच्या दिवशी शिराळा गावात ग्रामदेव-तेची पूजा करून नागांची एकाच वेळी मिरवणूक काढली जायची. परंतु वन्य जीव संरक्षण कायद्यानुसार २००२ पासून सापांना पकडण्यावर बंदी आली.त्यामुळे काही वर्षांपासून शिराळ्यात फक्त नागाच्या प्रतिकात्मक मूर्तीची मिरवणूक काढली जाते. सध्या शिराळामध्ये ६५ नागराज मंडळे आहेत ही प्रतिकात्मक नाग पूजा करतात व प्रतिकात्मक नागमूर्तीची मिरवणूक काढतात.

आज वन्य जीव संरक्षण कायद्यामुळे अनेक प्राण्यांना जीवनदान मिळाले आहे. त्यामुळे संपूर्ण प्राणी-मात्रांची जोपासना करण्याचे दायित्व आपणा सर्वांवर आहे. आजही भारतातील महाराष्ट्र, राजस्थान, मध्यप्रदेश, गुजरात, केरळ, तामिळनाडू या प्रांतात नागपूजा मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरी केली जाते. मध्यप्रदेशातील सातपुडा पर्वतावर भारतातील तीर्थस्थान नागव्दार प्रसिद्ध आहे. या ठिकाणी नागाचा वास मोठ्या प्रमाणात असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे या ठिकाणी संपूर्ण श्रावण महिन्यात मोठ्या प्रमाणात भव्यदिव्य यात्रा असते. त्याचप्रमाणे याच परिसरात जटाशंकर नागाचे प्रसिद्ध ठिकाण आहे. येथील अशी आख्यायिका आहे की, भगवान शंकरजींचे तांडव सुरू असताना आपल्या केसांच्या जटा याच ठिकाणी आपटल्या होत्या. त्यामुळे या तीर्थक्षेत्राला जटाशंकर म्हणून संबोधले जाते.

श्रावण महिन्यांत बेलपत्तीला जास्त महत्त्व आहे. त्यामुळे शंकराची व नागाची पूजाअर्चा करताना बेलफुल वापरण्यात येतो. भारतीय संस्कृतीत प्रत्येक प्राणी, वनस्पती, फूल एवढंच काय तर संपूर्ण सृष्टीला देवाच्या रूपात पाहिलं जाते. त्यामुळे नाग-पंचमीच्या निमित्ताने संपूर्ण प्राणीमात्रांना वाचविण्याचासाठी निसर्ग प्रफुल्लित ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. याकरिता श्रावण महिन्याचे व नागपंचमीचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला पाहिजे. यामुळे निसर्ग प्रफुल्लित राहील व जंगलातील प्राण्यांना जंगलात राहण्याचा आनंद मिळेल.

आज पृथ्वीला वाचवायचे असेल तर प्रत्येक सणांना मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करणे अत्यंत गरजेचे आहे. कारण बदलत्या हवामानामुळे, ग्लोबल वॉर्मिंगमुळे व वाढत्या अलनिनोच्या प्रभावामुळे पर्यावरणात आमूलाग्र बदल झाला असून, देश मोठ्या प्रमाणात प्रदूषणाच्या विळख्यात सापडलेला आहे, यापासून सावरण्यासाठी वृक्षलागवड करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण वृक्षाशिवाय सृष्टी अधुरी आहे. त्यामुळे सर्वांसाठीच वृक्ष अनिवार्य आहे. पृथ्वी साबूत राहिली तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षित राहील अन्यथा विनाश अटळ आहे. कारण वृक्ष कटाईमुळे पृथ्वीचे संतुलन डगमगत आहे. त्यामुळे भूकंप, महाप्रलय, सुनामी, अती थंडी, अती उष्णता, ज्वालामुखी, दुष्काळ, भूस्खलन, समुद्राची पातळी वाढते अशा विविध धोकादायक घटना दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत असून भयावह रूप धारण करीत आहे. याकरिता येणाऱ्या विनाशापासुन वाचण्यासाठी झाडे लावा, जीव सृष्टी वाचवा हा मूलमंत्र सर्वांनीच अंगिकारला पाहिजे. नागव्दार स्वामी की जय! जय नाग देवता! हर हर महादेव!

**-रमेश लांजेवार**
नागपूर
मो. ९९२१६९०७७९

# पैसा, श्रद्धा, नाती आणि अस्तित्त्वाचा शोध



आपण जे रोज बघतो, जगतो, अनुभवतो, तेच खरं आयुष्य आहे का, की या भौतिक जगाच्या पलीकडेही काही अनाकलनीय आणि अथांग जग अस्तित्वात आहे? हा प्रश्न कधी ना कधी प्रत्येक संवेदनशील मनाला, विचारवंताला आणि आत्मपरीक्षण करणाऱ्या माणसाला अस्वस्थ करत असतो. आपण आयुष्यात मोठी स्वप्नं बघतो, ती पूर्ण व्हावीत म्हणून दिवस-रात्र रक्ताचं पाणी करून धडपड करतो; कधी ती स्वप्नं भरारी घेतात आणि पूर्ण होतात, तर कधी काचेसारख्या तुटणाऱ्या किंवा कोमेजलेल्या पानासारख्या क्षणात तुटून मातीमोल होतात. पण आपलं आयुष्य खरंच एवढ्याच क्षुल्लक गोष्टींसाठी असतं का? आपली स्वप्नं आणि सुखं फक्त पैशांच्या जोरावरच पूर्ण होतात का? आजच्या आधुनिक युगात पैसा हा जरी माणसाचा सगळ्यात मोठा पासपोर्ट आणि गरज बनला असला, तरी या भौतिक जगाच्या पलीकडे जाऊन आपलं खरं अस्तित्व नेमकं कशात आहे, याचा सखोल शोध घेण्याची वेळ आज आली आहे. अथांग ब्रम्हांड आणि आपली क्षुद्र, पण तितकीच सुंदर उपस्थिती या अमर्याद आणि अथांग ब्रम्हांडात, एका छोट्याशा 'मिल्की वे' गॅलेक्सीच्या कोपऱ्यात असणाऱ्या आणि सहज न सापडणाऱ्या अशा आपल्या पृथ्वीवर आपण मानवजातीचा इतिहास घडवतोय. जिथे आपल्या एका छोट्याशा ग्रहाचा शोध घेणं आणि त्याचा आवाका समजणं हेच विज्ञानासाठी एक अवाढव्य कोडं आहे, तिथे आपण मानवाने स्वतःचा अहंकार किती मोठा करावा? कशाची आणि किती पराकोटीची इच्छा बाळगावी?

आपला निर्माता नेमका कोण आहे, या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी मानव हजारो वर्षांपासून धर्म, अध्यात्म आणि विज्ञानाच्या वाटेवर चालत आलाय, पण आजतागायत त्याचे कोणतेही ठोस, अकाट्य भौतिक प्रमाण आपल्या हातात आलेले नाही. रामायण आणि महाभारत यांसारखे आपले ऐतिहासिक महाग्रंथ आपल्याला नीतिमत्ता काय असते, समाजासोबत कसं जगावं, नाती कशी जपायची हे उत्तम प्रकारे शिकवतात. कणाकणात परमेश्वर आहे, अशी अगाध श्रद्धा भारतीय संस्कृतीत रुजवली गेली आहे. पण तरीही, आजपर्यंत उघड्या डोळ्यांनी देव प्रत्यक्ष कोणी पाहिलाय का? याचा कोणताही वैज्ञानिक किंवा तार्किक पुरावा आपल्याकडे नाही. असे असतानाही, दुसरीकडे देवावर अपार श्रद्धा ठेवून जगणारे, मंदिरात जाऊन किंवा प्रार्थना करून मन शांत अनुभवणारे कोटी-कोटी लोक या जगात आहेत आणि त्यांचा तो व्यक्तिगत अनुभव अत्यंत खरा असतो.

श्रद्धा, मानसिकता आणि मानवी मनाची ताकद या सर्व आध्यात्मिक आणि धार्मिक अनुभवामागे एक अतिशय सखोल मानसशास्त्र दडलेले असते. आपण जेव्हा एखाद्या अज्ञातावर किंवा दैवी शक्तीवर अगाध श्रद्धा ठेवून, थोड्या भीतीपोटी किंवा दृढ विश्वासाने पूजा-अर्चा करतो, तेव्हा आपला तो दिवस मानसिकदृष्ट्या खूप चांगला आणि आत्मविश्वासाने भरलेला जातो. का बरं असं होतं? कारण त्यामुळे आपला स्वतःचा अंतःस्थ आत्मविश्वास दुणावलेला असतो. ही पूर्णपणे एक मानसोपचारासारखी प्रक्रिया आहे. आपण केवळ एका दैवी शक्तीच्या किंवा ऊर्जेच्या नावाचा उच्चार जरी केला, तरी आपल्या मेंदूला एक सकारात्मक ऊर्जा मिळते आणि आपण संकटांचा सामना अधिक धैर्याने करू शकतो. याचा अर्थ असा मुळीच नव्हे की आपण श्रद्धा ठेवू नये किंवा कोणी देव मानू नये; प्रत्येकाची श्रद्धा, त्याची भक्ती ही अत्यंत व्यक्तिगत आणि आदरणीय बाब आहे. परंतु, डोळे झाकून अंधश्रद्धेच्या गर्तेत जाणे आणि प्रत्येक नैसर्गिक घटनेला चमत्कार मानणे यात खूप मोठा फरक आहे. आजच्या काळातील काही धूर्त धर्मगुरू मानसोपचाराचे हे मानसशास्त्रीय तंत्र अचूक ओळखून लोकांना विश्वासात घेतात आणि त्यांची मानसिकता हाताळतात, हेही आपण समजून घेतले पाहिजे. जर आयुष्यातलं सर्व काही आधीच आपल्या नशिबाने किंवा दैवाने ठरवून टाकलं असतं, तर माणसाने कर्म करण्याचे आणि मेहनत करण्याचे सगळे मार्ग केव्हाच बंद केले असते. जर सर्वकाही नशिबावरच चालत असतं, तर आपण रोज चुका करूनही, काहीही प्रयत्न न करता एकाच जागी मुकपणे गप्प बसलो असतो, तर आपलं आयुष्य चाललं असतं का? हा अतिशय कळीचा प्रश्न आहे.

आज आपण एकविसाव्या शतकात, तंत्रज्ञानाच्या उच्च शिखरावर वावरतोय. माणसाने इतकी मोठी प्रगती केली आहे की, आपण पृथ्वीवरून थेट अंतराळात झेपावतोय. विज्ञानाने जग मुठीत आणलंय; पण या भौतिक प्रगतीच्या पलीकडे जाऊन विचार केला, तर आजही आपल्याला ठाऊक नाही की या संपूर्ण निसर्गाच्या मागे नेमकी कोणती सर्वोच्च शक्ती कार्यरत आहे? हे सगळं केवळ निसर्गाचा खेळ आहे, की याला चालवणारा एखादा अदृश्य सूत्रधार आहे? या प्रश्नांची उत्तरं आजही अनुत्तरित आहेत.

आपलं कर्म नेमकं कोण पाहतंय? आपल्या प्रत्येक चांगल्या-वाईटाची नोंद ठेवणारी ती अज्ञात शक्ती कोण आहे, हे आपल्याला कधीच ठाऊक नसते. आपण केवळ वर्षानुवर्षे ऐकत आलेल्या पौराणिक गोष्टी आणि कल्पनेच्या जोरावर आयुष्य जगतो. खरंच गरुड पुराण खरं आहे का? स्वर्ग आणि नरक प्रत्यक्षात अस्तित्वात आहेत का? या प्रश्नांची कोणतीही खात्रीशीर उत्तरे आपल्या हातात नसतात.

मेल्यानंतर पुढचा जन्म खरंच असतो का? याचं उत्तर आजवर कोणीही पुराव्यासह दिलेलं नाही. गरुड पुराणाच्या किंवा पापाच्या भीतीपोटी अनेकजण आयुष्यभर नको त्या बंधनात जगतात. पण स्वर्ग आणि नर्क आभाळाच्या पलीकडे किंवा पाताळात नसतात; ते माणसाच्या याच जगण्यात असतात. जेव्हा आपण कोणाच्या चेहऱ्यावर वेदना आणतो तो नर्क असतो, आणि जेव्हा आपण प्रामाणिकपणे जगून कोणाला मदतीचा हात देतो तोच खरा स्वर्ग असतो.

आपण जन्माला आल्यापासून मरेपर्यंत प्रामुख्याने दोन गोष्टींच्या मागे धावतो - एक म्हणजे पैसा आणि दुसरी म्हणजे समाज काय म्हणेल? ही भीती.

**पैसा:** आजच्या समाजात आपण एक अतिशय भयानक व्यवस्था निर्माण केली आहे. ज्याच्याकडे भरपूर पैसा आहे, त्यालाच मान-सन्मान मिळतो; आणि ज्याच्याकडे पैसा नाही, त्या गरीब माणसाला सतत तुच्छ लेखलं जातं. पैशाच्या तराजूत माणसाची योग्यता मोजली जाणारी हीच का आपली मानवी प्रगती?

आजच्या भौतिकवादी युगात पैशाला जे वलय प्राप्त झालं आहे, त्याने मानवी नात्यांचे आणि बंधनांचे संपूर्ण रूपच बदलून टाकले आहे. पूर्वीच्या काळात नाती ही विश्वासावर आणि आपुलकीवर टिकून असायची, पण आज माणसा-माणसांमधील समीकरणांचे मोजमाप बँक बॅलन्स आणि आर्थिक सुबत्ता यावर केले जाते. पैसा संपला की नातीही संपतात हे आजच्या काळातील एक अत्यंत क्रूर आणि विदारक सत्य बनले आहे. जोपर्यंत खिशात पैसा आहे, तोपर्यंत सगे-सोबती अवतीभोवती असतात. पण जेव्हा वाईट वेळ येते, तेव्हा अचानक हे सगळे चेहरे पांगायला लागतात. जेव्हा पैसा संपल्यावर नाती संपतात, तेव्हा समजून घ्यावे की आपण चुकीच्या लोकांसोबत प्रवास करत होतो. रक्ताची किंवा मनाची खरी नाती पैशाने मोजता येत नाहीत; जी माणसं संकटातही पाठीशी उभी राहतात, तीच खरी संपत्ती असतात. या सगळ्यातून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे माणूस म्हणून माणसाला समजून घेणे यातच खऱ्या आयुष्याचा अर्थ दडला आहे. आजकाल आपण प्रत्येक माणसातील केवळ त्याचे दोष, त्रुटी आणि उणिवा शोधण्यातच धन्यता मानतो. पण कोणातही दोष शोधण्यापेक्षा त्याच्यातील चांगले गुण किंवा चांगुलपणा ओळखून, त्याचा स्वीकार करत माणुसकी जपण्यात काय हरकत आहे?

प्रत्येक मनुष्य हा चुकांचा पुतळा असतो, कुणीही परिपूर्ण नसतं. आज आपण भौतिक जगतात इतके पुढे आलोय की, माणसांसोबत वेळ घालवण्यापेक्षा आपल्याला मोबाईलचे स्क्रीन आणि पैशांचे व्यवहार जास्त जवळचे वाटू लागले आहेत. आपण एकमेकांच्या चुकांवर बोट ठेवण्याऐवजी एकमेकांच्या भावनांना समजून घेतलं, तर हे जग राहण्यासाठी अधिक सुंदर होऊ शकते. नाती ही दोषांवर नाही, तर एकमेकांच्या चांगुलपणावर आणि आदरभावावर टिकून असतात. मग आपण ही सगळी धावपळ, अभ्यास, नोकरी, व्यवसायाची खटपट कशासाठी करत आहोत? याचं प्रामाणिक उत्तर आहे - स्वतःच्या आत्मिक समाधानासाठी, आपल्या कुटुंबासाठी आणि आपल्या माणसांच्या चेहऱ्यावर हसू आणण्यासाठी.

आयुष्य म्हणजे केवळ पैशांची चढाओढ, दिखावा किंवा भविष्यातील न पाहिलेल्या स्वर्ग-नर्काच्या भीतीत घालवण्याची शर्यत नव्हे. माणसाचं खरं अस्तित्व त्याच्या बँक बॅलन्समध्ये नसून त्याच्या उदात्त विचारांत, त्याच्या प्रामाणिक कर्मात, आणि संवेदनशील स्वभावात दडलेले असते. गरज आहे ती पैशाच्या आणि दिखाव्याच्या या खोट्या गुलामगिरीतून स्वतःची सुटका करून घेण्याची, आणि एका अर्थपूर्ण, स्वाभिमानी, संवेदनशील आणि आनंदी आयुष्य जगण्याची! कारण अंततः आयुष्य हे भीतीपोटी किंवा शंकेपोटी घालवण्यासाठी नाही, तर मुक्त मनाने आणि आनंदाने अनुभवण्यासाठी मिळाले आहे. या संपूर्ण प्रवासानंतर एक गोष्ट ठळकपणे समोर येते - आयुष्य खूप मोठं आणि अथांग आहे, पण आपण मात्र ते अगदी संक्षिप्त आणि मोजक्याच चौकटीत जगण्याचा प्रयत्न केला आहे. एक लेखक म्हणून मला हेच सांगायचे आहे की, आपण आपल्या या सुंदर आयुष्याला केवळ पैशांच्या नोटांमध्ये, समाजाच्या खोट्या प्रतिष्ठेत, न पाहिलेल्या स्वर्ग-नर्काच्या भीतीमध्ये आणि रोजच्या धावपळीत पूर्णपणे आकुंचित करून ठेवले आहे. ज्या विश्वाचा आणि ब्रह्मांडाचा आपल्याला थांगपत्ताच नाही, त्या अज्ञात भविष्यापोटी आपण आपलं आजचं जिवंत वर्तमान आणि हक्काचा आनंद विसरून जातो.

आयुष्य म्हणजे कोणतीही मोजमापाची शर्यत नव्हे, तर तो अनुभवण्याचा एक सुंदर प्रवास आहे. पैशाची गुलामगिरी झुगारून, भीतीच्या बंधनांना तोडून, एकमेकांमधील माणुसकी जपून आणि स्वतःच्या अस्तित्वाची खरी ओळख निर्माण करून जगण्यातच आयुष्याचे खरे सार्थक आहे!

**-रोहित भोसीकर**
संचालक: भोसीकर फुड्स, नांदेड
मो. ८८०५५७५५५५

# राजेश देशमुख कुंटूरकर : संयमी नेतृत्त्वाचा प्रेरणादायी प्रवास

प्रामाणिकपणा, पारदर्शकता, संयमी स्वभाव आणि सर्वसमावेशक विचारसरणीच्या जोरावर जनमानसात आपली वेगळी ओळख निर्माण करणारे कुंटूरकर समूहाचे प्रमुख राजेश गंगाधरराव देशमुख कुंटूरकर यांचा वाढदिवस उत्साहात साजरा होत आहे. राजकीय घराण्याची पार्श्वभूमी लाभूनही पदाचा गर्व किंवा अहंकार न बाळगता सामान्य कार्यकर्त्याप्रमाणे जनतेत मिसळणे, ही त्यांच्या व्यक्ति-मत्त्वाची विशेष ओळख आहे.



शिक्षण पूर्ण केल्यानंतर १९९५ मध्ये त्यांनी सक्रिय राजकारणात प्रवेश केला. कुंटूर ग्रामपंचायत सदस्य, उपसरपंच, पंचायत समिती सदस्य, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, मुंबई मार्केट कमिटीचे संचालक तसेच भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे सांभाळल्या. प्रत्येक पदावर काम करताना संघटन, सहकार्य आणि जनसेवा यांना त्यांनी प्राधान्य दिले.

राजेश कुंटूरकर यांच्या नेतृत्वाची खरी ओळख त्यांच्या माणुसकीच्या दृष्टिकोनातून होते. कार्यकर्त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, अडचणीच्या प्रसंगी मदतीसाठी धावून जाणे आणि गरजूंना शक्य ती मदत करण्याची त्यांची भूमिका कायम राहिली आहे. युवक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि सामान्य नागरिकांना प्रोत्साहन देत त्यांनी अनेकांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण केले आहेत.

राजकारणात मतभेद होऊ शकतात; मात्र मनभेद होऊ नयेत, अशी त्यांची भूमिका असल्याचे त्यांच्या सहकाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळेच विविध विचारांच्या व्यक्तींशी संवाद साधत सर्वांना सोबत घेऊन जाणारे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

कुठल्याही अडचणीच्या प्रसंगी संयम न सोडता सकारात्मक विचाराने मार्ग काढणे हा त्यांच्या स्वभावाचा महत्त्वाचा गुण आहे. कुंटूरकर शुगर अँड ॲग्रो प्रा. लि. प्रकल्पाच्या वाटचालीत विविध अडचणी आल्या. मात्र त्यावर शांतपणे मार्ग काढत कर्मचारी आणि सहकाऱ्यांना विश्वास देण्याचे काम त्यांनी केले. संकटाच्या काळात आपल्या माणसांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, हेच खरे नेतृत्व असल्याचे त्यांनी कृतीतून दाखवून दिले.

भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून काम करताना पक्षश्रेष्ठींच्या निर्णयाला आणि संघटनेला त्यांनी नेहमीच महत्त्व दिले. नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या उमेदवारीची चर्चा झाली होती. तसेच नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत पक्षाच्या आदेशाचा मान राखत त्यांनी बिनशर्त माघार घेतली. पदापेक्षा पक्ष आणि संघटना महत्त्वाची मानण्याची त्यांची भूमिका यातून स्पष्ट झाली.

आज कुंटूरकर ॲग्रोचे चेअरमन म्हणून त्यांनी उद्योग क्षेत्रातही आपला ठसा उमटविला आहे. राजकारणासोबत सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि धार्मिक क्षेत्रातही त्यांचा सहभाग राहिला आहे. गरजू घटकांना मदत, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन आणि युवकांना पुढे जाण्यासाठी आधार देण्याचे काम त्यांनी सातत्याने केले आहे.

माणसे जोडण्याची हातोटी, सुख-दुःखात सोबत राहण्याची वृत्ती, संकटात संयम आणि निर्णय घेताना सकारात्मक दृष्टिकोन या गुणांमुळे राजेश देशमुख कुंटूरकर यांचा आजवरचा प्रवास हा पदांपेक्षा माणुसकीला महत्त्व देणाऱ्या नेतृत्वाचा प्रवास ठरला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या कार्यपद्धतीतून प्रेरणा घेत जनसेवेचा प्रवास पुढे नेण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. भविष्यात पक्षाने कोणतीही जबाबदारी दिल्यास ती समर्थपणे पार पाडण्याची क्षमता त्यांच्यात असल्याचा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये आहे.

राजेश गंगाधरराव देशमुख कुंटूरकर यांना वाढदिवसानिमित्त आई तुळजाभवानीचे आशीर्वाद लाभावेत. त्यांना निरोगी दीर्घायुष्य, यश व भावी सामाजिक-राजकीय वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

**-सुनील रामदासी**
पत्रकार
शेळगाव, ता. नायगाव, जि. नांदेड

# शेतकरी हितासह सर्वांगीण विकासावर भर -पालकमंत्री सावे

## भारतीय स्वातंत्र्य दिनाचा मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ संपन्न





**नांदेड (प्रतिनिधी)** - 'हर घर तिरंगा' अभियानाला नांदेडकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याबद्दल अभिनंदन करतानाच शेतकरी, महिला, विद्यार्थी, कामगार व वंचित घटकांच्या सर्वांगीण विकासावर भर देणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपरिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात बलिदान दिलेल्या सर्वांचे स्मरण करुन त्यांनी यावेळी भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या.

भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिन समारंभानिमित्त नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रागंणात शनिवारी पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. या समारंभास माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोक चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंदराव पाटील बोंढारकर, महापौर कविता मुळे, नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यासह लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्य सैनिक यांचे वारसदार, माजी सैनिक, विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती, विभाग प्रमुख, पत्रकार, नागरिक, विद्यार्थी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६'ची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. योजनेच्या पहिल्या टप्प्यात नांदेड जिल्ह्यातील जवळपास १३ हजार शेतकऱ्यांना लाभ मिळाला असून, सुमारे १०६ कोटी २५ लाख रुपये त्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले आहेत. शेतकऱ्यांनी योजनेच्या लाभासाठी ग्रीस्टॅक नोंदणी व आधार प्रमाणीकरण पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन पालकमंत्री अतुल सावे यांनी केले. यासोबतच शेतकऱ्यांना वीजबिलात सवलत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही शासनाने घेतला असून, कर्जाचा भार कमी करण्याबरोबरच शेतीच्या वीज खर्चात दिलासा देण्याचे काम शासन करत असल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाने 'महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६' नुकतेच मंजूर करून शेती व शेतीपूरक व्यवसायात कार्यरत महिलांना शेतकरी म्हणून अधिकृत दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे. या अनुषंगाने नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयात 'महिला शेतकरी मदत कक्ष' सुरू करण्यात आला असून, या माध्यमातून महिला शेतकऱ्यांना विविध शासकीय योजना, सुविधा व हक्कांबाबत मार्गदर्शन आणि मदत मिळणार असल्याची माहिती पालकमंत्री अतुल सावे यांनी दिली.

जिल्ह्यात मतदार याद्यांच्या एसआयआर प्रक्रियेचे काम अंतिम टप्प्यात असून, जिल्हा प्रशासनाने या कामात उल्लेखनीय प्रगती केली आहे. मात्र, ज्या मतदारांनी अद्याप गणनापत्रक भरून दिलेले नाही, त्यांनी विहित मुदतीत ते 'बीएलओ'कडे जमा करावेत, असे आवाहन पालकमंत्री सावे यांनी केले.

भूसंपादन प्रक्रियेत पारदर्शकता, गतिमानता आणि सुलभता आणण्यासाठी 'महाभूसंपादन व लडार' प्रणाली विकसित करण्यात आली आहे. तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरातून नागरिकांना अधिक चांगल्या सेवा देण्याच्या या उपक्रमाबद्दल जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, उपजिल्हाधिकारी प्रियंका कर्डिले, उपविभागीय अधिकारी प्रविण मेगशेट्टी आणि त्यांच्या टीमचे कौतुक पालकमंत्री सावे यांनी केले. तसेच कंधार तालुक्यातील बहादरपुरा येथील बबनराव पेठकर यांनी मुलाच्या विवाह सोहळ्यात ३ हजार ३६५ नागरिकांचा विमा उतरवून राबविलेल्या समाजोपयोगी उपक्रमाचा आदर्श सर्वांनी घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्ह्यातील डॉ. शंकरराव चव्हाण विष्णुपुरी प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला असून, पिण्याच्या पाण्यासह सिंचनासाठीही मोठा दिलासा मिळाला आहे. जिल्ह्यात खरीप हंगामातील ९९ टक्के पेरणी पूर्ण झाली असून पिकांची स्थिती चांगली आहे. शेतकऱ्यांना अडचणी येऊ नयेत यासाठी प्रशासन दक्षतेने काम करीत असल्याचे पालकमंत्री सावे यांनी सांगितले.

# नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयात 'हर घर तिरंगा' अभियान उत्साहात



**नांदेड (प्रतिनिधी)** - नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाच्या वतीने स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर 'हर घर तिरंगा' अभियान उत्साहपूर्ण वातावरणात राबविण्यात आले. या अभियानांतर्गत १४ ऑगस्ट रोजी भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रभक्ती, देशप्रेम आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देत महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

रॅलीच्या प्रारंभी अभिनव भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बालासाहेबपांडे, कोषाध्यक्ष कैलासचंद काला, सचिवा ॲड. वनिताताई रवींद्र जोशी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार कुलकर्णी यांच्या उपस्थितीत हिरवा झेंडा दाखवून रॅलीला मार्गक्रमण करण्यास सुरुवात करण्यात आली. तसेच यावेळी या अभियानांतर्गत नशा मुक्तीची शपथ प्राचार्यांच्या हस्ते उपस्थितांना देण्यात आली.

यावेळी एनसीसी विभाग प्रमुख लेफ्टनंट डॉ. किशोर इंगळे, एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय कुलकर्णी, डॉ. गिरीश पांडे व डॉ. सारिका लहानकर यांच्या नेतृत्वाखाली रॅलीचे आयोजन करण्यात आले. 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' आणि 'हर घर तिरंगा' अशा देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. हातात तिरंगा ध्वज घेऊन सहभागी झालेल्या एनसीसी छात्रसैनिक व एनएसएस स्वयंसेवकांनी नागरिकांमध्ये राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला.

या रॅलीमध्ये महाविद्यालया-तील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच एनसीसीचे छात्रसैनिक आणि एनएसएसचे विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. महाविद्यालयातील अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या एकजुटीने अभियानाला विशेष भव्यता प्राप्त झाली.

तिरंगा रॅली हनुमान पेठ, तिरंगा चौक, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, गांधी पुतळा व महावीर चौक या प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत पुन्हा महाविद्यालयाच्या प्रांगणात परतली. रॅलीदरम्यान नागरिकांचे लक्ष वेधून घेत परिसरात देशभक्तीचा उत्साहपूर्ण माहोल निर्माण झाला.

'हर घर तिरंगा' अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक घरावर तिरंगा आणि प्रत्येक भारतीयाच्या मनात राष्ट्रभक्ती हा संदेश देण्यात आला. तिरंग्याचा सन्मान, राष्ट्राचा अभिमान आणि देशभक्तीची भावना जागृत करणाऱ्या या अभियानाला महाविद्यालयातील सर्व घटकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालकांचा सोमठाणा येथे सत्कार



**उमरी (प्रतिनिधी)** -नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे नवनिर्वाचित संचालक कैलासराव देशमुख गोरठेकर, रामचंद्र मुसळे, दत्तात्रेय रेडी यांचा सोमठाणा ग्रामपंचायतीच्या वतीने सत्कार करण्यात आला

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच मंजुषा बालाजीराव पंतोजी यांची उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सभापती शिरीषराव देशमुख गोरठेकर, आनंदराव यलमगौडे,बालाजी पंतोजी, नारायण जिरोणेकर, राजू पाटील ढगे, गणेश आनेमवाड, कबीर सिंगनवाड, हनमंत जाधव आदी उपस्थित होते.

याप्रसंगी जि. प. प्रा. शाळा सोमठाणा येथील विद्यार्थी नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षेत उतीर्ण झाल्याबद्दल कोल्हेवाड स्वरा बालाजी या विद्यार्थ्यांचा नवनिर्वाचित संचालक कैलासराव देशमुख गोरठेकर, रामचंद्र मुसळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी पांडुरंग कोल्हेवाड, गंगाधर चिंताके, राहुल सोनकांबळे, मुख्याध्यापक पाटील, शिक्षक शिंदे, मुरकुटे, दशरथ कांबळे, शिक्षिका संगीता सिंगरवाड, ग्रामपंचायतचे सरपंच, उपसपंच, सदस्य, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाभुळगाव येथील नृसिंह मंदिरात श्रावण महिन्यातील पहिला शनिवार निमित्ताने दर्शनासाठी गर्दी, महाप्रसाद आयोजन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** - श्रावण मास पहिल्या शनिवार निमित्ताने बाभुळगाव येथील नृसिंह देवांच्या मंदिरात अभिषेक व महापूजा करून महाप्रसाद आयोजन मस्के परिवार व समस्त गावकरी यांच्या वतीने करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्रावण महिन्यातील पहिला शनिवार निमित्ताने बाभुळगाव येथील नृसिंह मंदिर विधीवित पूजा व अभिषेक करण्यात आले. यावेळी सचिन स्वामी यांच्या अधिपत्याखाली मंत्रोच्चार करून अभिषेक व महाआरती करण्यात आली. या वेळी यजमान मधुकर मस्के, दीपक मस्के, सुधाकर मस्के, दामाजी मस्के, वैजनाथ मस्के, माधव मस्के, संतोष मस्के, आनंद पाटील म्हस्के, पांडु तेलंगे यांनी अभिषेक केला.

दुपारी मस्के परिवार व गावकरी यांच्या वतीने महाप्रसाद आयोजित करण्यात आला होता. यावेळी सिडको-हडको व गुंडेगावातील भाविक-भक्तांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवस्मारक मंडळाच्यावतीने गुणवंतांचा सत्कार संपन्न

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** - शिवस्मारक मंडळ व समस्त गावकरी मंडळाच्या वतीने विष्णुपुरी गावातील गुणवंतांचा सत्कार सोहळा व निःशुल्क आरोग्य चिकित्सा शिबीर दि.१५ ऑगस्ट रोजी विष्णुपुरी येथे उत्साहात पार पडले.

प्रथमच या वर्षी शिवस्मारक मंडळ यांच्या वतीने दहावी, बारावी, उच्चमाध्यमिक, शिष्यवृत्ती यासह विविध क्षेत्रांतील विशेष प्राविण्य मिळविणारे गुणवंत व सामाजिक राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी यांचा सत्कार मान्यवर पदाधिकारी यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

या सोहळयासाठी व चिकित्सक शिबिराच्या लाभासाठी गरजूंनी उपस्थित राहून लाभ घेतला. या कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.

# एनईपी-२०२० अंतर्गत ओजीटी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी उद्या एकदिवसीय कार्यशाळा

**नांदेड (प्रतिनिधी)**- प्रतिभा निकेतन महाविद्यालय नांदेड आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने एनईपी-२०२० अंतर्गत बी.एस्सी. तृतीय वर्षासाठी नव्याने सुरू करण्यात आलेल्या On Job Training (OJT) कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन प्रतिभा निकेतन महाविद्यालयात करण्यात आले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून बी. एस्सी. तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमात ४ क्रेडिट्सचा OJT घटक समाविष्ट करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना सैद्धांतिक ज्ञानासोबत प्रत्यक्ष औद्योगिक व व्यावसायिक अनुभव मिळावा, त्यांची व्यावहारिक कौशल्ये व रोजगारक्षमता वाढावी, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

कार्यशाळेत OJT ची रचना व नियोजन, Training Modules, विद्यार्थी Monitoring d Mentorship, ssessment d Evaluation, Report Writing, Documentation तसेच University Compliance याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यासोबतच उद्योग शिक्षण संस्था सहकार्य आणि OJT संदर्भातील उत्तम पद्धतींबाबत चर्चा केली जाणार आहे.

कार्यशाळेस विज्ञान शाखेतील विभाग प्रमुख, बी.एस्सी. तृतीय वर्षाचे अध्यापक, IQC समन्वयक, Internship/OJT समन्वयक, Board of Studies सदस्य व cademic Coordinators यांना सहभागी होण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. तरी जास्तीत जास्त संबंधितांनी सदर कार्यशाळेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन कार्यशाळेचे संयोजक प्राचार्य डॉ. के. आर. गंगाखेडकर व आयोजन सचिव उपप्राचार्य डॉ. दिलीप स्वामी यांनी केले आहे.

# माळाकोळी, ठकुतांडा, नगारवाडी, लव्हराळ रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम सुरू करा, अन्यथा उपोषण

**लोहा (प्रतिनिधी)**- तालुक्यातील माळाकोळी, ठकुतांडा, नगारवाडी, लव्हराळ सदरील रस्ता M.D.R. असलेल्या रस्त्याचे डांबरीकरणाचे व पुलाचे काम तत्काळ मंजूर करून कामास सुरूवात करा अन्यथा लवकरच उपोषण करण्याचा इशारा सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता यांना एका निवेदनाद्वारे शिवाजी मारोती जायभाये यांनी दिला आहे.

या निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, तालुक्यातील माळाकोळी, ठकुतांडा, नगारवाडी, लव्हराळ हा रस्ता अत्यंत खराब झाला आहे. हा रस्ता १० वाड्या, १० तांडे, व ०२ तीर्थक्षेत्रांना जोडणारा रस्ता आहे. तसेच कंधार येथील हाजीसया देवस्थान व रेणुकामाता देवस्थान या तीर्थक्षेत्रांना हा रस्ता जोडणारा आहे. बारमाही वाहतूक सुरळीत करण्यासाठी व रा. प. महामंडळाच्या बसेस चालू राहण्यासाठी व खेडोपाडी वाहतुकीसाठी हाच एकमेव सोयीचा रस्ता असून, तो तात्काळ मंजूर करून काम चालू करावे, डांबरीकरणाचे काम त्वरित करावे अन्यथा ग्रामपंचायत कार्यालय नगारवाडी ता. लोहा येथे तीव्र आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

या निवेदनाच्या प्रती तहसीलदार, लोहा, गटविकास अधिकारी पं.स.लोहा, उपविभागीय अधिकारी कार्यालय कंधार, उपविभागीय अभियंता सा. बा. विभाग लोहा,सा.बा.विभाग नांदेड,उप वि. पो. अ. कार्यालय कंधार, पोलिस अधिक्षक कार्यालय नांदेड, सामान्य प्रशासन विभाग जि. प. नांदेड, बांधकाम विभाग जि. प. नांदेड आदींना दिल्या असल्याचे शिवाजी मारोती जायभाये यांनी सांगितले.

# पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या लाभार्थ्यांना कर्जमुक्ती प्रमाणपत्रांचे वितरण



**नांदेड (प्रतिनिधी)** - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६'ची नांदेड जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. या योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील जवळपास १३ हजार शेतकऱ्यांना लाभ मिळाला असून, सुमारे १०६ कोटी २५ लाख रुपये त्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात रविवारी आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते या योजनेच्या जिल्ह्यातील ७ लाभार्थी शेतकऱ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात कर्जमुक्ती (बेबाक) प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी पालकमंत्री अतुल सावे यांनी जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ मिळविण्यासाठी ग्रीस्टॅक नोंदणी तसेच आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन केले. योजनेचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक कार्यवाही सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

या निमित्ताने जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालयांमध्येही कर्जमुक्ती प्रमाणपत्र वितरणाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. कार्यक्रमास खासदार डॉ. अजित गोपछडे, महापौर श्रीमती कविता मुळे, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, मनपा आयुक्त डॉ. महेश डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड, भूमी अभिलेख विभागाच्या जिल्हा अधीक्षक सीमा देशमुख, उपजिल्हाधिकारी प्रियंका कर्डिले, जिल्हा शल्य चिकित्सक संजय पेरके, जिल्हा आरोग्य अधिकारी संतोष नवले, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, जिल्हा उपनिबंधक शाहुराज हिरे यांच्यासह लोकप्रतिनिधी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# 'यशवंत' मधील प्रा. ओमप्रकाश गुंजकर यांचे राज्यस्तरीय सुयश



**नांदेड (प्रतिनिधी)** - यशवंत कनिष्ठ महाविद्यालयातील सुप्रसिद्ध जलतरणपटू व समाजशास्त्राचे प्रा. ओमप्रकाश नागनाथराव गुंजकर यांनी श्री शिवछत्रपती स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, बालेवाडी, पुणे येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत दोन ब्रांझ पदके पटकावली आहेत.

महाराष्ट्र अक्क्हेटिक असोसिएशनतर्फे स्विमिंग फेडरेशन ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र ऑलीम्पिक असोसिएशनच्या वतीने आयोजित महाराष्ट्र स्टेट मास्टर्स अक्केटिक चॅम्पियनशिप: २०२६ राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेतील सुयशाबद्दल माजी प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ.गणेशचंद्र एन. शिंदे यांनी प्रा. ओमप्रकाश गुंजकर यांचे यथोचित स्वागत केले आणि राष्ट्रस्तरीय जलतरण स्पर्धेत निवड झाल्याबद्दल अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. अजय गव्हाणे, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. नरेंद्र कंचटवार, लेफ्टनंट प्रा. श्रीकांत सोमठाणकर यांची उपस्थिती होती.

# नरसी चौक हिरवागार करण्याचा संकल्प; चारही महामार्गांच्या दुभाजकात ८०० वृक्षांची लागवड



**नरसीफाटा (प्रतिनिधी)**- येथील चारही महामार्गांच्या दुभाजकात स्वखर्चाने तब्बल ८०० वृक्षांची लागवड करून नरसी चौकाच्या सौंदर्यात भर घालण्याबरोबरच पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश देण्यात आला आहे. युवा उद्योगपती राजेश पाटील भिलवंडे, सरपंच गजानन (पप्पू) पाटील भिलवंडे, गोविंद हाणवते व चंद्रशेखर माधवराव भिलवंडे यांनी पुढाकार घेत हा सामाजिक उपक्रम राबविला.

पुणे येथून स्वखर्चाने विविध प्रकारची झाडे आणण्यात आली. त्यानंतर जेसीबीच्या सहाय्याने महामार्गांच्या दुभाजकात खड्डे करून मजुरांमार्फत वृक्षारोपण करण्यात आले. नरसी चौकातून जाणाऱ्या प्रत्येक महामार्गाच्या दुभाजकात सुमारे २०० झाडे लावण्यात आली आहेत. त्यामुळे येत्या काळात या मार्गांचे रूप हिरवाईने बहरणार आहे.

विशेष म्हणजे, नरसीलगतच्या जिगळा येथील किन्नर आखाड्यातील पाणीपूजन व भव्य शोभायात्रा नरसी चौकात दाखल झाली असता श्री श्री १००८ आचार्या महामंडलेश्वर लक्ष्मीनारायण त्रिपाठी यांच्या हस्तेही वृक्षारोपण करण्यात आले. त्यामुळे या उपक्रमाला सामाजिक व पर्यावरणीय संदेशाची विशेष जोड मिळाली.

वृक्षारोपण करून थांबायचे नाही, तर लावलेल्या प्रत्येक झाडाचे संगोपन करण्याचाही वसा या सामाजिक कार्यकर्त्यांनी घेतला आहे. वाढत्या वाहतुकीच्या काळात नरसी चौकातील महामार्ग हिरवाईने नटविण्याचा हा उपक्रम निश्चितच अनुकरणीय असून, पर्यावरण संवर्धनासाठी इतरांनीही पुढे यावे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला आहे.

# पुरुषोत्तम खेमका यांचे निधन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** - एम.आय.डी.सी. सिडको नांदेड भागातील नांदेड रोलर फ्लोअर मिलचे मालक पुरुषोत्तमलाल गोवर्धन खेमका यांच्ये अल्पशा आजाराने १६ ऑगस्ट रोजी सुरत येथील निवासस्थानी निधन झाले. निधन समयी त्यांचे वय ९० वर्षे होते

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सुना, नातू, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर १६ ऑगस्ट रोजी सायंकाळी सुरत येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# बेलदार-गवंडी समाजाच्या शिष्टमंडळाने घेतली जिल्हाधिकाऱ्यांची भेट



**नांदेड (प्रतिनिधी)**- बेलदार, गवंडी समाजाच्या शिष्टमंडळाने विविध मागण्यां-विषयी जिल्हाधिकारी राहुल कर्डिलं यांची नुकतीच भेट घेतली.

यावेळी बेलदार, गवंडी समाजाच्या विद्यार्थी वसतिगृह व समाज भवनाच्या जागेच्या मागणी संदर्भात नांदेड उत्तरचे आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात डॉ. राहुल कर्डिले यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन संबंधितांना समाजासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीस समाजाच्या शिष्टमंडळात विनायकराव सगर, डॉ. ज्ञानेश्वर वडमिलवार, प्रल्हाद आयनेले, राजेश बुरपल्ले, विनायकराव आचमे, बापूराव पेंडलवार, राम एडते, लक्ष्मणराव पेंडलवार, जयराम शेट्टे आदींची उपस्थिती होती.

गेल्या अनेक वर्षापासून बेलदार, गवंडी समाजाच्या नियोजित जागा मागणी संदर्भात आमदार बालाजीराव कल्याणकर व शासन स्तरावर समाजाच्या् कार्यकर्त्यांनी जागेसाठी पाठपुरावा सुरू केला होता. नांदेडच्या उत्तर विधानसभा मतदारसंघात पासदगाव येथे नियोजित जागेची पाहणी यापूर्वी समाजाच्या कार्यकर्त्यांनी केली होती. आ. कल्याणकर यांनी प्रशासन स्तरावर जागा उपलब्ध करून देण्याबाबत शिफारस करून शिष्टमंडळाला निमंत्रित करून जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशासकीय स्तरावर बैठक लावल्यामुळे जागा उपलब्ध होण्याबाबत प्रशासकीय कार्य-वाहीस सुरुवात झाल्याने सामाजिक कार्यकर्त्यांनी आ. बालाजीराव कल्याणकर यांचे आभार मानून, आनंद व्यक्त केला आहे.

# प्रगतीमंत्र

# PM मोदींच्या खासगी सचिव IFS निधी तिवारी कोण आहेत?

## बारावीनंतर परदेशात शिक्षण घ्यायचे आहे?

**बारावीनंतर अमेरिका, कॅनडा यांसारख्या देशांमध्ये उच्च शिक्षण घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध प्रवेश परीक्षांना सामोरे जावे लागते. यापैकी AP (Advanced Placement) परीक्षा ही विद्यार्थ्यांची शैक्षणिक क्षमता आणि महाविद्यालयीन स्तरावरील अभ्यासासाठीची तयारी तपासणारी महत्त्वाची परीक्षा मानली जाते. मात्र, परदेशातील विद्यापीठांमध्ये प्रवेशासाठी AP परीक्षा अनिवार्य आहेच, असे नाही.**

### AP परीक्षा का ठरते महत्त्वाची?

» AP परीक्षेचे महत्त्व काय? : परदेशात शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी AP परीक्षा केवळ प्रमाणपत्र मिळवण्यापुरती मर्यादित नाही. विद्यार्थ्याने शैक्षणिक आव्हानांसाठी स्वतःला कितपत तयार केले आहे आणि नवीन गोष्टी शिकण्याची त्याची क्षमता व उत्सुकता किती आहे, याचेही संकेत या गुणांमधून मिळतात. अनेकदा विद्यापीठांसमोर जवळपास समान शैक्षणिक कामगिरी असलेल्या दोन विद्यार्थ्यांपैकी एकाची निवड करण्याची वेळ येते. अशा वेळी AP गुण हा निर्णय घेण्यासाठी उपयुक्त ठरू शकतो. विविध शाळा आणि देशांमधून आलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक क्षमतेची तुलना करण्यासाठीही हा एक प्रमाणित निकष ठरतो.



» AP गुण 'टाय-ब्रेकर' का ठरतात? : परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांची संख्या मोठी असते. त्यामुळे समान गुण किंवा जवळपास समान शैक्षणिक कामगिरी असलेल्या विद्यार्थ्यांमधून योग्य उमेदवार निवडण्यासाठी विद्यापीठांना विश्वासार्ह निकषांची आवश्यकता असते. विद्यार्थ्याने शाळेतील अभ्यासक्रमाबरोबरच आव्हानात्मक आणि अवघड विषय निवडले आहेत का, याकडेही विद्यापीठे लक्ष देतात. कठीण अभ्यासक्रम स्वतःहून निवडणे हे विद्यार्थ्याची मेहनत, जिज्ञासा आणि नवीन ज्ञान आत्मसात करण्याची तयारी दर्शवते. हे गुण पुढील महाविद्यालयीन शिक्षणात यशस्वी होण्यासाठी उपयुक्त ठरतात. मात्र, केवळ AP गुणांच्या आधारावर प्रवेश निश्चित होत नाही. विद्यार्थ्याची संपूर्ण शैक्षणिक कामगिरी, निबंध, अभ्यासेतर उपक्रम आणि इतर बाबींचा एकत्रित विचार करून प्रवेशाचा निर्णय घेतला जातो. विशेषतः नामांकित विद्यापीठांमध्ये अर्ज करताना चांगले AP गुण विद्यार्थ्याचा अर्ज अधिक प्रभावी बनवू शकतात.

» शाळेत AP अभ्यासक्रम नसला तरी परीक्षा देता येते का? : होय. विद्यार्थ्याच्या शाळेत अधिकृत AP अभ्यासक्रम उपलब्ध असणे आवश्यक नाही. स्वतः अभ्यास करणारे किंवा ऑनलाइन माध्यमातून AP विषयाची तयारी करणारे विद्यार्थी नोंदणीकृत परीक्षा केंद्रामार्फत थेट AP परीक्षेसाठी नोंदणी करू शकतात. भारतासारख्या देशांतील विद्यार्थ्यांसाठी ही सुविधा विशेष महत्त्वाची आहे. आपल्या शाळेच्या नियमित अभ्यासक्रमापेक्षा अधिक ज्ञान मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना AP परीक्षेच्या माध्यमातून आपली विषयावरील पकड सिद्ध करण्याची संधी मिळते. थोडक्यात, AP परीक्षा ही परदेशातील विद्यापीठांमध्ये प्रवेशाची हमी देणारी परीक्षा नसली, तरी विद्यार्थ्याची शैक्षणिक क्षमता आणि महाविद्यालयीन स्तरावरील अभ्यासासाठीची तयारी दाखवणारा महत्त्वाचा अतिरिक्त निकष ठरू शकते.

## वैज्ञानिकाची नोकरी सोडून UPSCची वाट धरली...

**भारतीय परराष्ट्र सेवेतील (IFS) अधिकारी निधी तिवारी यांचा प्रधानमंत्री कार्यालयापर्यंतचा प्रवास जिद्द, मेहनत आणि ध्येय निश्चितीचे उदाहरण आहे. जैवरसायनशास्त्रात सुवर्णपदक मिळवलेल्या निधी तिवारी यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात भाभा अणुसंशोधन केंद्रात (BARC) वैज्ञानिक म्हणून केली. मात्र, विज्ञान क्षेत्रातील सुरक्षित नोकरी सोडून त्यांनी नागरी सेवेत जाण्याचा निर्णय घेतला. UPSC नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर त्या भारतीय परराष्ट्र सेवेत दाखल झाल्या. त्यानंतर सरकारमधील विविध महत्त्वाच्या पदांवर काम करत त्यांनी जबाबदाऱ्या पार पाडल्या. मार्च २०२५ मध्ये त्यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या खासगी सचिवपदी नियुक्ती झाली.**



» UPSCमध्ये ९६वा क्रमांक; २०१४च्या तुकडीत IFS अधिकारी : निधी तिवारी यांनी UPSC नागरी सेवा परीक्षेची तयारी सुरूच ठेवली. २०१३च्या नागरी सेवा परीक्षेत त्यांनी अखिल भारतीय स्तरावर ९६वा क्रमांक मिळवला. त्यानंतर २०१४च्या तुकडीत त्यांची भारतीय परराष्ट्र सेवेसाठी (IFS) निवड झाली. यापूर्वी त्यांनी २०१२ची नागरी सेवा परीक्षाही उत्तीर्ण केली होती, मात्र त्यावेळी त्यांचे नाव प्रतीक्षा यादीत होते.

» परराष्ट्र मंत्रालयापासून PMOपर्यंतचा प्रवास : IFS अधिकारी म्हणून निधी तिवारी यांनी परराष्ट्र मंत्रालयातही महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. तेथे त्यांनी निरस्त्रीकरण आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित विषयांवर काम केले. नोव्हेंबर २०२२ मध्ये त्या पंतप्रधान कार्यालयात (PMO) अवर सचिव म्हणून दाखल झाल्या. त्यानंतर त्यांना उपसचिवपदी बढती देण्यात आली. PMOमधील कार्यकाळात त्यांनी राष्ट्रीय सुरक्षा आणि परराष्ट्र धोरणाशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर काम केले. उपलब्ध माहितीनुसार, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांच्यासोबतही त्यांनी सुरक्षेशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर काम केले आहे.



» मार्च २०२५मध्ये पंतप्रधानांच्या खासगी सचिवपदी नियुक्ती : PMOमध्ये उपसचिव म्हणून काम केल्यानंतर मार्च २०२५मध्ये निधी तिवारी यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या खासगी सचिवपदी नियुक्ती झाली. वैज्ञानिक म्हणून कारकीर्द सुरू करून उत्तर प्रदेशातील राज्यसेवा, त्यानंतर भारतीय परराष्ट्र सेवा आणि पुढे पंतप्रधान कार्यालयातील महत्त्वाची जबाबदारी असा त्यांचा प्रवास झाला आहे. विज्ञान क्षेत्रातील यशस्वी कारकीर्द सोडून नागरी सेवेत येण्याचा घेतलेला निर्णय आणि त्यानंतर मिळवलेले यश हे निधी तिवारी यांच्या कारकीर्दीचे विशेष वैशिष्ट्य ठरते.

### लखनौ विद्यापीठातून BSc; जैवरसायनशास्त्रात सुवर्णपदक

निधी तिवारी या उत्तर प्रदेशातील लखनौच्या रहिवासी असल्याचे उपलब्ध माहितीनुसार सांगितले जाते. त्यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण लखनौमध्ये झाले. त्यानंतर २००४ मध्ये लखनौ विद्यापीठातून जैवरसायनशास्त्र विषयात BSc पदवी त्यांनी मिळवली. या परीक्षेत त्यांनी सुवर्णपदक पटकावले. पुढील शिक्षणासाठी त्यांनी बनारस हिंदू विद्यापीठात (BHU) प्रवेश घेतला. २००५ मध्ये जैवरसायनशास्त्रातील MSc अभ्यासक्रमात प्रवेश घेतल्यानंतर २००७ मध्ये पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. या वेळीही त्यांनी सुवर्णपदक मिळवले.

### BARCमध्ये वैज्ञानिक म्हणून कारकीर्द

पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर निधी तिवारी यांनी वैज्ञानिक संशोधन क्षेत्रात करिअर करण्याचा निर्णय घेतला. २००७ मध्ये त्यांची भाभा अणुसंशोधन केंद्रात (BARC) निवड झाली आणि नोकरीनिमित्त त्या महाराष्ट्रात आल्या. BARCमधील वैज्ञानिक प्रशिक्षणातही त्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक मिळवले. विज्ञान क्षेत्रात चांगली कारकीर्द सुरू असतानाही त्यांच्या मनात नागरी सेवेत काम करण्याची आणि सार्वजनिक प्रशासनात योगदान देण्याची इच्छा होती.

### BARCची नोकरी सांभाळून नागरी सेवेसाठी तयारी

सुमारे २००८च्या आसपास निधी यांनी नागरी सेवेत जाण्याची तयारी सुरू केली. कुटुंबासोबत राहून त्यांनी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास केला. त्यांनी सर्वप्रथम २००८ मध्ये उत्तर प्रदेश लोकसेवा आयोगाची (UPPSC) परीक्षा दिली. या परीक्षेत त्यांची वाणिज्यिक कर विभागात सहायक आयुक्त म्हणून निवड झाली. सुमारे दोन वर्षे त्यांनी या पदावर काम केले. मात्र, उच्च नागरी सेवेत जाण्याचे त्यांचे ध्येय कायम होते.

## वडील गटार खोदायचे, आई भाजी विकायची

# 20 लाखांची नोकरी नाकारून शरण कांबळे झाले IPS अधिकारी!



**परिस्थिती कितीही कठीण असली, तरी जिद्द, मेहनत आणि ध्येय निश्चित असेल तर यश मिळवता येते, हे IPS अधिकारी शरण कांबळे यांच्या संघर्षमय प्रवासातून दिसून येते. सोलापूरच्या अत्यंत साध्या कुटुंबातून आलेल्या शरण यांनी बालपणी गरिबीचा सामना केला. वडील गटार खोदण्याचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते, तर शरण स्वतः आईसोबत भाजी विकण्यासाठी जात होते. मात्र, या प्रतिकूल परिस्थितीने त्यांची स्वप्ने थांबवली नाहीत.**

### वीज नसलेल्या कच्च्या घरात बालपण

शरण कांबळे यांचे बालपण सोलापूरमध्ये अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गेले. त्यांच्या घरात वीज नव्हती. कच्च्या घरात राहून त्यांनी शिक्षण घेतले. शाळेत जाण्यासाठी अनेकदा त्यांना मैलोनमैल पायी चालावे लागत असे. काही वेळा बसच्या छतावरूनही प्रवास करावा लागला. या अडचणी असूनही त्यांनी शिक्षणाची कास सोडली नाही. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने वडील गावात गटार खोदण्यासह विविध मजुरीची कामे करत होते. कुटुंबाचा उदरनिर्वाह कठीण होत असल्याने त्यांच्या आईने शेतातील भाजीपाला विकण्यास सुरुवात केली. शरणही शिक्षणासोबत वेळ काढून आईला भाजी विक्रीच्या कामात मदत करत होते.

### शिष्यवृत्तीच्या बळावर BTech; वर्गात अव्वल

शरण यांनी आर्थिक अडचणींमुळे शिक्षणाशी कधीही तडजोड केली नाही. मेहनतीच्या जोरावर त्यांनी शिष्यवृत्ती मिळवली आणि BTechचे शिक्षण पूर्ण केले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांना अनेक विद्यार्थ्यांकडे असलेली आधुनिक साधने आणि इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व दिसत होते. मात्र, त्यातून त्यांनी न्यूनगंड निर्माण होऊ दिला नाही. उपलब्ध साधनांचा योग्य वापर करून त्यांनी सातत्याने अभ्यास केला. मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर ते वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये गणले जाऊ लागले.

### 20 लाखांचे पॅकेज; तरीही UPSCची वाट निवडली

BTechनंतर शरण यांना एका प्रतिष्ठित कंपनीकडून तब्बल २० लाख रुपयांच्या वार्षिक पॅकेजची नोकरीची संधी मिळाली. ही संधी स्वीकारण्याचा सल्ला अनेकांनी त्यांना दिला. मात्र, शरण यांच्या मनात देशसेवेचे स्वप्न होते. त्यामुळे त्यांनी आकर्षक नोकरीपेक्षा नागरी सेवेत जाण्याचा निर्णय घेतला आणि UPSC परीक्षेची तयारी सुरू केली.

### 2019 मध्ये CAPF मध्ये देशात आठवा क्रमांक

शरण यांच्या मेहनतीचे फळ मिळण्यास सुरुवात झाली. २०१९ मध्ये त्यांनी UPSC CAPF परीक्षेत अखिल भारतीय स्तरावर आठवा क्रमांक मिळवला. त्यानंतर त्यांनी नागरी सेवा परीक्षेची तयारी आणखी जोमाने सुरू ठेवली. शरण यांनी २०२० मध्ये UPSC नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण केली आणि ५४२वा क्रमांक मिळवला. या यशामुळे त्यांचे IPS अधिकारी होण्याचे स्वप्न साकार झाले. त्यांच्या प्रवासात मुलाखतीचाही महत्त्वाचा टप्पा होता. त्यांनी तीन वेळा मुलाखतीला सामोरे जात प्रयत्न सुरू ठेवले. त्यानंतर UPSC IFSमध्ये त्यांनी १२७वा क्रमांक मिळवला. शरण कांबळे यांची कहाणी केवळ UPSCमधील यशाची नाही, तर गरिबी, प्रतिकूल परिस्थिती आणि मर्यादित साधनांवर मात करून ध्येय गाठण्याच्या जिद्दीची प्रेरणादायी कहाणी आहे. वडिलांची मजुरी, आईसोबत केलेली भाजीविक्री, कच्च्या घरातील बालपण आणि आर्थिक अडचणी यांना मागे टाकत त्यांनी देशाच्या प्रतिष्ठित सेवेत स्थान मिळवले.



# आयकर विभागात भरती



**आयकर विभागात नोकरी करण्याची इच्छा असलेल्या उमेदवारांसाठी महत्त्वाची संधी उपलब्ध झाली आहे. आयकर विभागाच्या मध्य प्रदेश आणि छत्तीसगड क्षेत्रात कॅन्टीन अटेंडंट पदासाठी भरती प्रक्रिया सुरू झाली आहे. या भरतीसाठी किमान शैक्षणिक पात्रता दहावी उत्तीर्ण अशी आहे. इच्छुक उमेदवारांना ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. आयकर विभागाने या भरतीचे अधिकृत अधिसूचना संकेतस्थळावर प्रसिद्ध केले असून, अर्ज प्रक्रिया ऑनलाइन सुरू करण्यात आली आहे. ही पदे जनरल सेंट्रल सर्व्हिस, गट-क अंतर्गत आहेत.**

### भरतीचा तपशील

- विभाग : आयकर विभाग, भारत सरकार
- पद : कॅन्टीन अटेंडंट
- सेवा : जनरल सेंट्रल सर्व्हिस, गट-क
- एकूण पदे : ७
- शैक्षणिक पात्रता : दहावी उत्तीर्ण
- वयोमर्यादा : १८ ते २५ वर्षे
- अधिकृत संकेतस्थळ : incometaxmpcg.gov.in

» शैक्षणिक पात्रता आणि वयोमर्यादा : कॅन्टीन अटेंडंट पदासाठी उमेदवाराने मान्यताप्राप्त शिक्षण मंडळातून दहावीची परीक्षा उत्तीर्ण केलेली असणे आवश्यक आहे. उमेदवाराचे वय किमान १८ आणि कमाल २५ वर्षे असावे. म्हणजेच जन्मतारीख १ सप्टेंबर २००१ पूर्वीची आणि ३१ ऑगस्ट २००८ नंतरची नसावी. राखीव प्रवर्गातील उमेदवारांना शासनाच्या नियमानुसार कमाल वयोमर्यादेत सवलत मिळेल.

» किती मिळेल पगार? : कॅन्टीन अटेंडंट पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर-१ मिळेल. या पदासाठी वेतनश्रेणी १८,००० ते ५६,९०० रुपये प्रतिमहिना आहे. नोकरीचे कार्यक्षेत्र मध्य प्रदेश आणि छत्तीसगड असेल.

» अर्जासाठी कोणती कागदपत्रे आवश्यक? : ऑनलाइन अर्ज करताना उमेदवारांनी दहावीची गुणपत्रिका, आधार कार्ड, पासपोर्ट आकाराचा फोटो तसेच लागू असल्यास EWS, OBC, SC, ST आणि दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र आदी कागदपत्रे तयार ठेवावीत. आवश्यक कागदपत्रांच्या स्कॅन केलेल्या प्रतीही उपलब्ध ठेवणे आवश्यक आहे.

» ३१ ऑगस्टपर्यंत ऑनलाइन अर्ज : या भरतीसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २०२६ आहे. अर्ज केवळ ऑनलाइन पद्धतीने स्वीकारले जाणार आहेत. पोस्ट, फॅक्स, ई-मेल किंवा प्रत्यक्ष कार्यालयात जाऊन दिलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्ज शुल्क आकारले जाणार नाही. इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वी आयकर विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध भरतीची अधिसूचना काळजीपूर्वक वाचूनच अर्ज करावा.

### निवड प्रक्रिया कशी असेल?

» प्राथमिक छाननी : एकूण सात पदांसाठी २८० उमेदवारांची लेखी परीक्षेसाठी प्राथमिक निवड केली जाईल. यासाठी दहावीच्या परीक्षेतील गुणांचा आधार घेतला जाईल.

» लेखी परीक्षा : लेखी परीक्षा ३० मिनिटांची असेल. त्यात एकूण ४० बहुपर्यायी प्रश्न विचारले जातील. प्रत्येक प्रश्नाला एक गुण असेल. परीक्षेत इंग्रजी आकलन, हिंदी आकलन, अन्न व पोषण, संख्यात्मक क्षमता, स्वच्छता आणि साफसफाई या विषयांवर प्रश्न असतील. परीक्षेत प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी १/४ गुणांची नकारात्मक गुणांकन पद्धत असेल.

» कौशल्य चाचणी : लेखी परीक्षेनंतर ७० उमेदवारांची कौशल्य चाचणीसाठी निवड केली जाईल. ही चाचणी एकूण ६० गुणांची असेल. कॅन्टीन अटेंडंट पदाशी संबंधित कामे उमेदवार किती प्रभावीपणे करू शकतो, हे या चाचणीत तपासले जाईल.

» अंतिम निवड : लेखी परीक्षा आणि कौशल्य चाचणीतील कामगिरीच्या आधारे अंतिम गुणवत्ता यादी तयार केली जाईल. त्यानंतर पात्र उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी केली जाईल.



रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७७१७०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# खा. वसंतराव चव्हाण जयंतीनिमित्त राज्यस्तरीय लोकशाही वक्तृत्व स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)** – स्वातंत्र्य दिन तसेच दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे काँग्रेस कमिटीचे उत्तर जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे यांनी आयोजित केलेल्या राज्यस्तरीय 'लोकशाही वक्तृत्व स्पर्धे'ला राज्यभरातून आलेल्या स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. देशातील सद्यस्थिती, लोकशाहीसमोरील आव्हाने, युवकांची भूमिका आणि विविध ज्वलंत सामाजिक-राजकीय प्रश्नांवर स्पर्धकांनी परखड मते मांडली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार रविंद्र चव्हाण होते. प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. सुरेंद्र घोडजकर,



डॉ. श्रावण रॅपनवाड, डॉ. रेखा चव्हाण, अब्दुल गफार, आनंद चव्हाण, जेसिका शिंदे, मुन्ना आब्बास, गणेश ढगे, बाबा गौड, सत्यपाल सावंत, सुरज शिंदे, अक्षय नळगे, श्रीनिवास मोरे, अंबादास रातोळे, आदी उपस्थित होते.

स्पर्धेचे आयोजक तथा काँग्रेस कमिटीचे उत्तर जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे यांनी प्रास्ताविक केले. दिवंगत नेते वसंतराव चव्हाण यांनी काँग्रेसची विचारधारा शेवटपर्यंत जनमानसात रुजविण्याचे कार्य केले. त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. देशातील ज्वलंत प्रश्न आणि विविध धोरणांवर युवकांमध्ये वैचारिक मंथन व्हावे, हा स्पर्धेमागील उद्देश असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षीय भाषणात खासदार रविंद्र चव्हाण म्हणाले, वक्तृत्व स्पर्धांमधून युवकांमध्ये नेतृत्वगुण विकसित होतात. देशाच्या भवितव्यासाठी युवकांनी सक्रियपणे पुढे येणे आवश्यक आहे. युवकांच्या प्रश्नांसाठी राहुल गांधी खंबीरपणे उभे आहेत.

स्पर्धेत विशाल सवने यांनी प्रथम क्रमांक पटकावला. रोहित आढाव व ऋषिकेश कदम यांनी द्वितीय, तर आदित्य दराडे यांनी तृतीय क्रमांक मिळविला. सानिया शेख, वैभव बांगळे, गोविंद भांड, अलका खाडे, प्रीती जाधव आदींना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. परीक्षक म्हणून डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, डॉ. संदीप काळे व डॉ. विजय पवार यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन मुरलीधर हंबर्डे यांनी केले. स्पर्धेला श्रोत्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## अवैध व्यवसाय निर्मूलन मोहिमेत ८ कोटींचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दि. १ ते ३१ ऑगस्ट दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात अवैध दारू, गुटखा, मटका, जुगार, अंमली पदार्थ, घातक शस्त्रे इत्यादी विरोधी निर्मूलन मोहीम उघडली आहे.

सदर मोहिमेअंतर्गत दि. १ ते १५ ऑगस्ट दरम्यान संपलेल्या पंधरवड्यात नांदेड परिक्षेत्रात, गुटखा व्यावसायिकांविरुद्ध कलम १२३ भारतीय न्याय संहिते अंतर्गत (१८), महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत (१७२), महाराष्ट्र दारुबंदी कायदयान्वये (५२७), शस्त्र अधिनियमाअन्वये (२६), तर इतर अधिनियमाखाली (११०), अशा एकूण (८५३) कारवाया करुन (१३१५) इसमांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून ७ कोटी ९७ लाख ६१ हजार ७२४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार; मुखेड न्यायालयाने ७२ वर्षीय आरोपीला दोन वेळा जन्मठेप व २० हजार दंड

**नांदेड (प्रतिनिधी)**– मुक्रमाबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत दिनांक ६ ऑगस्ट २०२४ रोजी घडलेल्या अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचाराच्या गंभीर प्रकरणात मुखेड येथील पोक्सो न्यायालयाचे विशेष न्यायाधीश संतोष देशमुख यांनी आरोपीस दोषी ठरवून दोन स्वतंत्र कलमांखाली रोख दंडासह जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे.

६ ऑगस्ट २०२४ रोजी पीडित अल्पवयीन मुलगी आपल्या आईसोबत राहत होती. घटनेच्या दिवशी ती आरोपीच्या घरासमोर वाळत घातलेले कपडे काढण्यासाठी गेली असता, आरोपीने तिच्या असहाय्य परिस्थितीचा गैरफायदा घेत तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

या प्रकरणी मुक्रमाबाद पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १७१/२०२४ कलम ६४(२)(i)(I) भारतीय न्याय संहिता तसेच कलम ४ व ६ पोक्सो अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक सय्यद चांद सय्यद इब्राहिम यांनी केला. तपासादरम्यान पीडितेचा जबाब, तिच्या आईचा जबाब, शाळेतील प्रवेश नोंद, वैद्यकीय तपासणी अहवाल, फॉरेन्सिक वैद्यकीय अहवाल, घटनास्थळ पंचनामा, कपड्यांचा जप्ती पंचनामा, आरोपीचा वैद्यकीय तपासणी अहवाल तसेच इतर आवश्यक कागदपत्रे व पुरावे संकलित करून विहित वेळेत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

या प्रकरणाची सुनावणी Special Case No.19/2024 मध्ये झाली. न्यायालयाने दिनांक १४ ऑगस्ट २०२६ रोजी आरोपी बाबुराव ज्ञानोबा जाधव वय ७२ वर्षे, रा. बामणी, ता. मुखेड, जि. नांदेड यास दोषी ठरविले. न्यायालयाने आरोपीस पोक्सो कायदा, २०१२ चे कलम ४ अन्वये जन्मठेपेचा सश्रम कारावास व १० हजार रुपये दंड ठोठावला. दंड न भरल्यास १ वर्षाचा साधा कारावास भोगावा लागेल.

तसेच पोक्सो कायदा २०१२ चे कलम ६ अन्वये देखील आरोपीस जन्मठेपेचा सश्रम कारावास व १० हजार रुपये दंड ठोठावला. दंड न भरल्यास १ वर्षाचा साधा कारावास भोगावा लागेल. दोन्ही शिक्षेचा कारावासाचा कालावधी एकाच वेळी भोगावयाचा आहे. तसेच न्यायालयाने दंडापैकी १० हजार रुपये पीडितेस नुकसानभरपाई म्हणून देण्याचे निर्देश दिले आहेत.

या खटल्यात सरकार पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता ॲड. जी. बी. खिल्लारे यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. त्यांना पोलीस अंमलदार राजरत्न वाघमारे, मुक्रमाबाद पोलीस ठाणे यांनी मोलाचे सहकार्य केले.

## लोह्याचे भूमिपुत्र डीवायएसपी गजानन भातलवंडे यांना अतिविशिष्ट सेवा पदक जाहीर

**लोहा (प्रतिनिधी)** – लोह्याचे भूमिपुत्र व उदगीर येथील पोलीस उपाधीक्षक गजानन लक्ष्मीकांत भातलवंडे यांना राज्य सरकारचे अतिविशिष्ट सेवा पदक २०२६ जाहीर झाले होते. त्या अनुषंगाने पालकमंत्र्यांच्या हस्ते लातूर येथे शनिवारी स्वातंत्र्य दिनी गौरविण्यात आले आहे. त्यांना यापूर्वी राष्ट्रपती पदकाने सन्मानित करण्यात आले आहे.



या भूमिपुत्रांच्या सन्मानात आणखी एक मनाचा तुरा रोवला आहे. वडील लक्ष्मीकांत, आई शांताबाई, पत्नी सुषमा भातलवंडे यांचे या यशात मोठे योगदान असल्याचे त्यांनी सांगितले.

लोह्याचे भूमिपुत्र राज्याचे सेवानिवृत कृषी व सहकार आयुक्त कृष्णा लव्हेकर, सेवानिवृत विशेष पोलीस महानिरीक्षक मेहरबान राठोड यांनी मातृभूमीचा लौकिक वाढविला. सध्या मेहरबान राठोड यांचे चिरंजीव डॉ. विनयकुमार राठोड (आयपीएस) हे ठाणे येथे जिल्हा पोलीस अधीक्षक आहेत. त्यांच्या या यशाबद्दल भातलवंडे यांचे अनेकांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून महापालिकेत उत्कृष्ट कार्याबद्दल अधिकारी, कर्मचाऱ्यांना पुरस्कार प्रदान

**नांदेड़ (प्रतिनिधी)**– भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या ८० व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून उल्लेखनीय व उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मनपातील विविध विभागांच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ऑफिसर ऑफ द मंथ आणि एम्प्लॉयी ऑफ द मंथ हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

भारतीय स्वातंत्र्यदिनाचा ध्वजारोहण कार्यक्रम पार पडल्यानंतर महापौर कविता मुळे व मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.



या पुरस्काराच्या माध्यमातून शहराच्या विकासात आणि नागरी सुविधा पुरवण्यात अहोरात्र झटणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारण्यात आली. नगररचना, लेखा, आरोग्य, स्वच्छता, माहिती व तंत्रज्ञान व प्रशासकीय विभागात उत्कृष्ट काम करणाऱ्यांची यासाठी निवड करण्यात आली. पुरस्कार प्राप्त कर्मचाऱ्यांना मानपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या संकल्पनेतून महापालिकेत उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना ऑफिसर ऑफ द मंथ आणि एम्प्लॉयी ऑफ द मंथ हा पुरस्कार देण्यात येतो.

मागील वर्षभरात उत्कृष्ट कामगिरी बजावल्याबद्दल ऑफिसर ऑफ द ईयर हा पुरस्कार उपायुक्त अजितपालसिंग संधु यांना प्रदान करण्यात आला. तसेच माहे मे मध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल ऑफिसर ऑफ द मंथ हा पुरस्कार कनिष्ठ अभियंता रविंद्र सरपाते यांना प्रदान करण्यात आला तर एम्प्लॉयी ऑफ द मंथ साठी लेखा विभागातील वरिष्ठ लिपिक सतपालसिंग कोल्हापुरे यांची निवड करून त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

तसेच ऑफिसर ऑफ द मंथ हा पुरस्कार क्षेत्रिय अधिकारी रमेश चवरे यांना तर मंजू व्यास, प्रियंका एंगडे, डॉ. माधुरी मग्गिरवार, निलेश शातलवार यांना पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले.

## इकडचं तिकडचं

## ...मग ही जबाबदारी कुणाची?

गणवेशास सुट असणाऱ्या आठवड्यातील एका दिवशी, विचित्र वेश परिधान करून आलेल्या दहावीच्या मुलीला एका शिक्षकाने तिच्या ड्रेसबाबत हटकले. वसतिगृहात राहणारी ती मुलगी त्यानंतर आठ दिवस शाळेतच आली नाही म्हणे. शिक्षकांना वाटले शिक्षणासोबतच सुसंस्काराबाबत जागरूकता दाखविल्याबद्दल त्या मुलीच्या घरची मंडळी शाळेचे व शिक्षकाचे कौतुकच करतील. परंतु घडले निराळेच.

आठ दिवसांनी मुलगी घरच्यांना घेऊन शाळेत आली. वडील, भाऊ आणि भावाचे पाच-सहा मित्र असे सर्व मिळून आठ-दहा जणांच्या घोळक्याने त्या शिक्षकाला प्राचार्यांच्या कॅबिनला बोलावून घेतले आणि जाब विचारायला सुरुवात केली की, आमच्या मुलीच्या कपड्याबाबत भर वर्गात बोलण्याचा तुम्हाला अधिकार दिला कुणी? आम्ही तिला आठवड्याला एक नवीन ड्रेस घेऊन देतो. शाळेतल्या मास्तरकडे नसेल इतका किमती मोबाईल आम्ही तिला घेऊन दिला आहे. तुम्ही फक्त शालेय शिक्षण द्या, बाकी बकवास कशाला करता?

ब्रेकमध्ये ही घटना शाळेत आणि कालांतराने सगळ्या परिसरात पसरली. स्कूलव्हॅन ड्रायव्हरच्या घोळक्यात टी-ब्रेकमध्ये यावर चर्चा सुरू झाली. माझे लक्ष सहजच व्हॅन ड्रायव्हरच्या चर्चेकडे गेले.

नववी-दहावीच्या मुला-मुलींचे घर ते शाळा, या प्रवासादरम्यान चर्चेचे विषय कोणते असतात, हे व्हॅनमामाकडून ऐकून मीच थक्क झालो. मुलीचे वडील आणि भाऊ अशा ड्रेसचे समर्थन करु शकतात याचेही त्या व्हॅन ड्रायव्हरला आश्चर्य वाटत होते.

एमए,बीएड असूनही केवळ परिस्थितीमुळे स्कूल व्हॅन ड्रायव्हर बनलेल्या एकाने जनरेशन गॅपवरही आपलं मत मांडायला सुरुवात केली. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. लेकरांची कमी, मायबापांची चूक जास्त आहे, हे मी नेहमीच बोलतो. आज शिक्षकाला जाब विचारायला आलेल्या पालकांना बघून पटलं की तुम्हाला? आता कळलं का याला जबाबदार कोण?

मुलं शहाणी किंवा करती-सवरती झाली त्या कुटुंबात जनरेशन गॅप हा शब्द ऐकायला मिळतो. पिढी आणि जमाना, सगळंच बदलतंय; त्यामुळे मुलं आणि पालक यांच्या एकमेकांबाबतच्या अपेक्षाही बदलत आहेत. परंतु जनरेशन गॅप कमी करण्यासाठी आम्ही आमच्या मुलांना समजून घेतो हे जगाला दाखविण्याचे हे असले फॅड काय कामाचे? स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे हे त्या उच्चशिक्षित व्हॅन ड्रायव्हरचे वाक्य मात्र आवडले...

**शिवाजीराजे पाटील बाभळीकर**

# आ. भीमराव केराम यांच्या वाढदिवसानिमित्त किनवट येथे पाचशेहून अधिक रक्तदात्यांचे रक्तदान

**किनवट (प्रतिनिधी)** – आ. भीमराव केराम यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १५ ऑगस्ट रोजी येथील कलावती गार्डन येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला रक्तदात्यांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला असून, ५०० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले.

आ. भीमराव केराम यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांचे पुत्र प्रतीक व संदेश केराम यांच्या पुढाकारातून शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट रोजी नेत्रतपासणी तर दि. १५ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नेत्र तपासणीदरम्यान एकूण ८०० रुग्णांमध्ये मोतीबिंदू व इतर शस्त्रक्रियांची



आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले. या सर्व रुग्णांवर नागपूर येथील पद्मश्री डॉ. विकास महात्मे यांच्या महात्मे नेत्र रुग्णालयात मोफत शस्त्रक्रिया करण्यात येत आहेत. रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी नागपूर येथे ये-जा करण्यासाठी मोफत बससेवेची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. ही सेवा डॉ. महात्मे ट्रस्ट व संदेश केराम सोशल फाउंडेशन यांच्यावतीने करण्यात आली आहे.

या आरोग्य उपक्रमांतर्गत नेत्र तपासणीनंतर १ हजार २४३ गरजू रुग्णांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. त्यामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिकांना दृष्टीसंबंधी अडचणींवर मोठा दिलासा मिळाला असून, या उपक्रमाचा थेट लाभ हजारो नागरिकांना झाला आहे. रक्तदान शिबिरात ५०० हून अधिक रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून आ. केराम यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

वाढदिवसानिमित्त आ. केराम यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण, खा. अशोकराव चव्हाण, आ. अमर राजूरकर यांच्यासह अनेकांनी शुभेच्छा दिल्या.

## शक्तिपीठ जोगवा यात्रेचा आज अशोकनगरात भक्तिमय जागर

**नांदेड (प्रतिनिधी)**– श्रीक्षेत्र तुळजापूर येथे आयोजित करण्यात येणाऱ्या श्री दत्त दुर्गा महानुष्ठानम् निमित्त काढण्यात आलेल्या शक्तिपीठ जोगवा यात्रेचे सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी नांदेड शहरातील अशोकनगर येथे आगमन होणार आहे. दुपारी २ ते ३.३० या वेळेत हनुमान मंदिरात यात्रेचा विशेष थांबा होणार असून, या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरुतत्त्व प्रदीप यांच्या आयोजनातून सुरू असलेल्या या यात्रेदरम्यान कुलस्वामिनी आई भवानीचे पूजन, परडी पूजन, भजन तसेच जोगवा व गोंधळ पदांचा भक्तिमय कार्यक्रम होणार आहे. भाविकांना आई जगदंबेचे दर्शन घेऊन तिच्या पवित्र परडीत श्रद्धेने जोगवा अर्पण करण्याची संधी मिळणार आहे.

अ. भा. ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांनी नांदेडकरांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे. भाविकांनी आपल्या कुवतीनुसार गहू, डाळ, तेल, तूप आदी धान्यरूपी अथवा धनरूपी जोगवा आई भवानीच्या परडीत अर्पण करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com